## ढिगाऱ्याखाली लोकांचा शोध सुरूच

■ **वृत्तसंस्था, डेहराडून, दि. ९ :**
उत्तराखंडमध्ये ५ ऑगस्ट रोजी झालेल्या ढगफुटीनंतर, पुरामुळे हर्षिलमध्ये एक तलाव तयार झाला आहे. त्याच वेळी, धराली गावात ढिगाऱ्याखाली दबलेल्या लोकांचा शोध घेण्याचे काम सुरू झाले आहे.

यासाठी, सैन्य प्रगत भेदक रडार वापरत आहे. याच्या मदतीने, जमिनीत गाडलेले लोक खोदल्याशिवाय शोधता येतात. भेदक रडार जमिनीखाली उच्च वारंवारता रेडिओ लहरी पाठवते, जिथे ते वेगवेगळ्या रंगांद्वारे माती, दगड, धातू आणि हाडे शोधते. ५ ऑगस्ट रोजी दुपारी १.४५ वाजता उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली येथे ढगफुटी झाली. खीर गंगा नदीला आलेल्या पुरामुळे ३४ सेकंदात धराली गाव जमीनदोस्त झाले.


नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

* वर्ष १ * अंक ७२ * * नाशिक * रविवार, दिनांक १० ऑगस्ट २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)


## थोडक्यात

### ऑपरेशन सिंदूरमध्ये ५ पाकी विमाने पाडली

■ **बंगळुरू :** भारतीय हवाई दलाचे प्रमुख एपी सिंह यांनी शनिवारी सांगितले की, ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले. आम्ही त्यांची पाच लढाऊ विमाने पाडली. एपी सिंह यांनी बंगळुरू येथे एका कार्यक्रमात याची पुष्टी केली.



एअर चीफ मार्शल एपी सिंह म्हणाले, आमच्या हवाई संरक्षण यंत्रणेने उत्तम काम केले आहे. आम्ही अलीकडेच खरेदी केलेली एस-४०० प्रणाली गेम-चेंजर ठरली आहे. पाकिस्तानकडे लांब पल्ल्याचे ग्लाइड बॉम्ब होते पण ते त्यापैकी एकही वापरू शकले नाहीत कारण ते हवाई संरक्षणात भेदक होऊ शकत नव्हते. एपी सिंह बंगळुरूमधील एचएएल मॅनेजमेंट अकादमी सभागृहात एअर चीफ मार्शल एलएम कात्रे मेमोरियल लेक्चरच्या १६ व्या हंगामात बोलत होते.

### महाकाल व बाबा विश्वनाथ यांना बांधली राखी



■ **नवी दिल्ली :** आज देशभरात रक्षाबंधन सण साजरा केला जात आहे. श्रावण महिन्यात काशीमध्ये मंगला आरतीनंतर बाबा विश्वनाथांना रेशमी राखी बांधण्यात आली.
उज्जैनमधील महाकालेश्वर मंदिरात महाकालला राखी बांधण्यात आली. अमर पुजारीच्या कुटुंबातील महिलांनी तयार केलेली एक खास राखी त्यांना अर्पण करण्यात आली.
अयोध्येत, भगवान रामलल्ला आणि त्यांच्या भावांसाठी शृंगी धाम येथून राख्या आणण्यात आल्या. पंतप्रधान मोदींनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या.

### रेपच्या आरोपीने केली वकिलाची हत्या

■ **झाशी :** खटला लढवणाऱ्या वकिलाची त्याच्याच एका पक्षकाराने हत्या केली. वकील माझा खटला लढवत होता. ज्या मुलीसोबत मी एकत्र जगण्याची आणि मरण्याची शपथ घेतली होती, जिच्याशी मी लग्न करणार होतो, तिच्यावर बलात्कार केल्याबद्दल मला दोषी ठरवण्यात येणार होते. वकिलाने माझ्याकडून खूप पैसे घेतले. पण त्याने माझा खटला नीट लढवला नाही. म्हणूनच मी त्याला मारले, अशी कबुली आरोपीने दिले. भान प्रकाश सिरवारिया असे खून झालेल्या वकिलाचे नाव आहे तर सचिन वर्मा असे आरोपीचे नाव आहे. ॲड. भान प्रकाश झाशी न्यायालयात सचिनची बाजू मांडत होते.

## मतचोरीसंबंधी राहुल गांधींच्या आरोपांना
# शरद पवारांचे समर्थन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेल्या निवडणूक हेराफेरीच्या आरोपांचे शनिवारी जोरदार समर्थन केले. ते म्हणाले की, राहुल गांधी यांच्या आरोपांमध्ये तथ्य आहे. निवडणूक आयोगाने यावर स्पष्टीकरण द्यावे. या प्रकरणात राहुल गांधींवर प्रतिज्ञापत्र देण्यासाठी दबाव आणणे आयोगाला अजिबात योग्य नाही असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही हल्लाबोल केला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मंडळ यात्रा शनिवारी शरद पवार यांच्या उपस्थितीत सुरू झाली. यात्रेपूर्वी पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. जिथे त्यांनी महाराष्ट्र निवडणुकीसह विविध मुद्द्यांवर पत्रकारांशी संवाद साधला. निवडणूक हेराफेरीच्या मुद्द्यावर राहुल गांधी यांनी घेतलेल्या सातत्यपूर्ण भूमिकेचे शरद पवार यांनी जोरदार समर्थन केले.

शरद पवार म्हणाले की, जेव्हा विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या तेव्हा काही लोक दिल्लीत मला भेटायला आले. तिथे दोन लोक होते. सध्या माझ्याकडे त्यांची नावे आणि पत्ते नाहीत. त्यांनी मला त्या दिल्याही नाहीत. ते म्हणाले, महाराष्ट्र विधानसभेत २८८ जागा आहेत. आम्ही तुम्हाला हमी देतो की आम्ही १६० जागा जिंकू. पण त्यावेळी मला निवडणूक आयोगाबद्दल शंका नव्हती. म्हणून मी त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले कारण मी नेहमीच अशा लोकांना भेटत राहतो.

यानंतर मी त्या लोकांमध्ये आणि राहुल गांधींमध्ये बैठक आयोजित केली. त्यांनी राहुल गांधींसमोर आपला मुद्दा मांडला. मी जनतेच्या दरबारात जाण्याचे नाटक करून या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले. पण काल राहुल गांधींनी दिल्लीत पत्रकार परिषद घेतली. खूप मेहनत आणि यशस्वी अभ्यासानंतर ते सादर करण्यात आले.

राहुल गांधी यांनी दिलेल्या सादरीकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे. संवैधानिक लोकशाहीबद्दल लोकांच्या मनात शंका निर्माण करणे योग्य नाही. त्यामुळे त्याची सखोल चौकशी झाली पाहिजे. शरद पवार म्हणाले, सत्य समोर यावे अशी आमची विनंती आहे.

### निवडणूक आयोगाने गहू, भुसा वेगळा करावा : मुख्यमंत्र्यांवरही हल्लाबोल



> **निवडणूक आयोगाचा शपथपत्राचा आग्रह चुकीचा**
> राहुल गांधींनी बनावट मतदानाची अनेक उदाहरणे दिली. त्यांनी केवळ उदाहरणेच दिली नाहीत तर त्याचा आधारही स्पष्ट केला. पण आज असे दिसते की निवडणूक आयोगाने त्याचा वेगळा अर्थ लावण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी राहुल गांधींना चर्चेसाठी आमंत्रित केले. पण चर्चा करताना त्यांनी प्रतिज्ञापत्र देण्याची अट घातली. निवडणूक आयोग ही एक स्वतंत्र संस्था आहे. राहुल गांधी म्हणाले की मी खासदार होताच शपथ घेतली. त्यामुळे आता शपथ घेण्याची गरज नाही. त्यामुळे निवडणूक आयोगाचा प्रतिज्ञापत्र मागण्याचा आग्रह योग्य नाही, असे पवार म्हणाले.

**आयोगाने उत्तर द्यावे**

मतदार याद्यांमधील तफावतीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलेली भूमिकाही शरद पवार यांनी फेटाळून लावली. पवार म्हणाले, माझा एकमेव मुद्दा हा आहे की कोणाला आक्षेप आहे? आम्हाला मुख्यमंत्र्यांवर कोणताही आक्षेप नाही. आमचा आयोगावर आक्षेप आहे.

त्यामुळे निवडणूक आयोगावर आक्षेप घेतल्यानंतर, भाजप किंवा मुख्यमंत्र्यांनी त्यांचे मत व्यक्त करण्यासाठी पुढे येण्याची गरज नाही. आम्हाला निवडणूक आयोगाकडून उत्तर हवे आहे, इतर कोणाकडून नाही. आम्ही निष्क्रिय बसणार नाही. आम्हाला निर्णय घ्यावा लागेल. जर आमची माहिती चुकीची असेल तर आम्ही देशाला सांगावे. पण जर नसेल तर जे काही सत्य आहे ते बाहेर आणावे, असेही शरद पवार यावेळी म्हणाले . याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष शशीकांत शिंदे, अनिल देशमुख, आमदार रोहित पवार, जितेंद्र आव्हाड, सलिल देशमुख, प्रकाश गजभिये, राजेंद्र शिंगणे, उपस्थित होते.

## ३ दहशतवादी ठार २ जवान शहीद

■ **वृत्तसंस्था, कुलगाम, दि. ९ :**
जम्मू-काश्मीरमधील कुलगामच्या अखल जंगलात सुरक्षा दलांनी आणखी एका दहशतवाद्याला ठार मारले. १ ऑगस्टपासून सुरू असलेल्या कारवाईचा आज नववा दिवस आहे. आतापर्यंत ३ दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे.

शुक्रवारी रात्रीपासून सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये गोळीबार सुरू होता. यामध्ये चार सैनिक जखमी झाले. लान्स नाईक प्रितपाल सिंग आणि शिपाई हरमिंदर सिंग हे दोन सैनिक शहीद झाले.

२ ऑगस्ट रोजी सकाळी सुरक्षा दलांनी दोन दहशतवाद्यांना ठार केले. एका दहशतवाद्याची ओळख पुलवामा येथील हरिस नजीर दार म्हणून झाली, जो सी-श्रेणीचा दहशतवादी होता. पहलगाम हल्ल्यानंतर २६ एप्रिल रोजी गुप्तचर संस्थांनी ज्या १४ स्थानिक दहशतवाद्यांची नावे जाहीर केली होती, त्यात हरीसचा समावेश होता. त्याच्याकडून एके-४७ रायफल, मॅगझिन, ग्रेनेड आणि दारूगोळा जप्त करण्यात आला होता.

'ऑपरेशन अखल' हे स्पेशल ऑपरेशन्स ग्रुप, जम्मू आणि काश्मीर पोलिस, लष्कर आणि सीआरपीएफ यांच्याकडून राबवले जात आहे. जंगलात आणखी दहशतवादी लपले असण्याची शक्यता आहे.

## नवनीत राणांना धमकी देणाऱ्याला अटक

■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ९ :**
भाजपच्या नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांना समाज माध्यमावरून अश्लील शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देणाऱ्या तरूणाला हुडकून काढण्यात अमरावती पोलिसांना यश आले.
शेख इसा शेख मुसा (२८, रा. पथ्रोट, जि. अमरावती) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याचा भाऊ शेख मुस्ताक (३२, रा. पथ्रोट), भावसासरा मो. जाकीर शेख हसन (३७), एजाज खान अहमद खान (२४, रा. पथ्रोट) आणि जुबेर सुलतान सौदागर (२१, रा. तरोडा रिद्धपूर) यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

## इतके दिवस गप्प का?

### राहुल गांधी भेटले आणि वाणीला उधाण! फडणवीसांचा बाण

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ९ :**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांच्यावर टोकाची टीका केली असून, त्यांच्या अचानक वाढलेल्या राजकीय सक्रियतेवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे.



इतके दिवस पवार साहेब शांत होते, काही बोलले नाहीत... आणि राहुल गांधींशी भेट झाल्यानंतर अचानक का बोलू लागले? असा थेट सवाल फडणवीसांनी उपस्थित केला. ते म्हणाले, बॉलिवूडमध्ये सलीम-जावेद यांनी अनेक जबरदस्त कथा लिहिल्या. आज राहुल गांधी देखील अगदी तशीच स्टोरी बनवत आहेत, ज्यात पवार साहेब अचानक एंट्री मारतात! या तुलना ऐकून राजकीय पत्रकारांमध्ये हशा पिकला.

भाजप आमदार संजय शिरसाठ यांनी देखील पवार यांच्यावर निशाणा साधत विचारले. जर निवडणूक प्रक्रियेत काहीतरी चूक झाली असेल, तर मग निवडून आलेले नेते चुकीचे का नाहीत? की हा मुद्दा फक्त आपल्या सोयीनुसार काढला जातो?

**पवारांच्या गप्पीचा राजकीय अर्थ**

राजकीय विश्लेषकांच्या मते, शरद पवार यांची इतक्या दिवसांची शांतता आणि आता अचानक झालेला पॉलिटिकल ॲक्टिव्ह मोड यामागे अनेक गणिते दडलेली असू शकतात. राहुल गांधींची भेट, आगामी निवडणुका आणि महाराष्ट्रातील बदलते समीकरण या तिन्हींचा संगम आता राजकीय गोटात नवी चर्चा पेटवत आहे.

येत्या काही दिवसांत शरद पवार साहेब या चर्चेवर काय भूमिका घेतात, हे पाहण्यासाठी राजकीय वर्तुळात काउंटडाउन सुरू झालं आहे. एक मात्र निश्चित, महाराष्ट्राचं राजकारण आता पुन्हा हाय व्होल्टेज मोडमध्ये जाणार!

## रक्षाबंधनाच्या दिवशी दोन घटनांमध्ये
## दोन भावांचा दुर्दैवी मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. ९ :**
सलग दोन दिवस झालेल्या अपघातामुळे जिल्ह्यात शोककळा पसरली असतानाच रक्षाबंधनाच्या दिवशी घडलेल्या दोन विविध घटनांमध्ये दोन भावांना जीव गमवावा लागल्याने मृतांच्या कुटुंबीयांना धक्का बसला आहे.
पहिल्या घटनेत महावितरण कंपनीत सहायक अभियंता पदावर कार्यरत दलसू कटिया नरोटे (वय ३७) यांचा कारमपल्ली गावाजवळच्या नाल्यात बुडून मृत्यू झाला. तर सिरोंचाकडे जात असताना रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीला धडक दिल्याने मोटारसायकलवरील ८ वर्षीय बालकाचा मृत्यू झाला. तर वडील आणि आई जखमी झाले. दोघेही मृत रक्षाबंधनासाठी गावाकडे आले होते.

एटापल्ली तालुक्यातील कारमपल्ली येथील मूळ रहिवासी व नांदेड जिल्ह्यातील मुखेड येथे दलसू नरोटे हे सुट्या घेऊन जागतिक आदिवासी दिन व रक्षाबंधनासाठी पत्नी व दोन मुलांना घेऊन ७ ऑगस्टला मुलचेरा तालुक्यातील पुल्लीगुडम या आपल्या सासुरवाडीला गेले. दुसऱ्या दिवशी ते कारमपल्लीला गेले. तेथे शेतात धान रोवणी सुरु असल्याने ते शेतावर गेले. काही वेळाने ते जवळच्या नाल्यावर गेले. मात्र, मिरगी आल्याने ते नाल्यात पडले. त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

**रक्षाबंधनासाठी जात असताना अपघात**

असरअली येथील संतोष कोकू हे पत्नी व मुलाला घेऊन मोटारसायकलने सिरोंचा येथे रक्षाबंधनासाठी जात होते. अंकिसा येथे पोहचताच गावात रामकृष्ण चिरला यांच्या ट्रॅक्टर ट्रॉलीला मोटारसायकल धडकली. यात शौर्यचा जागीच मृत्यू झाला. संतोष कोकू यांचा डावा हात आणि पाय मोडला, तर सौंदर्या कोकू किरकोळ जखमी झाल्या.



■ **नागपूर :** आज देशभरात रक्षाबंधनाचा सण साजरा करण्यात आला. बहिणींनी आपल्या भावाला औक्षण करून राख्या बांधल्या. राजकीय नेत्यांच्या कुटुंबातही राखीचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना त्यांच्या भगिणीने राखी बांधली.
काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्या कुटुंबात त्यांच्या मुलीने आपल्या पित्याला राखी बांधली.

## मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना पाच वर्षे सुरूच राहणार : सीएम

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना आम्ही सुरू केली. विरोधकांनी आधी याबाबत मोठी वावटळ उठवली. हे भाऊ निवडणुकीपुरतेच पैसे देणार आहेत. नंतर हे पैसे बंद करतील असा अपप्रचार करण्यात आला. पण मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना आम्ही सुरूच ठेवली. इतकेच नाही तर ती पुढचे पाच वर्ष सुरूच राहणार आहे. योग्यवेळी या योजनेच्या निधीत आम्ही वाढही करणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. रक्षाबंधनानिमित्त लाडक्या बहिणीस भेट या कार्यक्रमात ते बोलत होते.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेमार्फत पात्र महिलेस दरमहा १५०० रुपए देण्यात येतात. राज्याच्या अर्थव्यवस्थेवर या योजनेचा मोठा बोजा पडत असून ही योजना बंद करण्यात येणार असल्याचा दावा विरोधकांकडून अनेकदा करण्यात येत असतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचा हा दावा पूर्णपणे रददबातल तर केला आहेच. पण या योजनेच्या निधीत योग्यवेळी वाढ करणार असल्याची ग्वाही देखील त्यांनी दिली आहे.

## साखरखेर्डा, पांढरदेवमध्ये ढगफुटीसदृश पाऊस

■ **बुलढाणा, दि. ९ :**
सिंदखेडराजा तालुक्यातील साखरखेर्डा परिसर आणि चिखली तालुक्यातील पांढरदेव गावात ९ ऑगस्ट रोजी ढगफुटी सदृश पाऊस झाला. साखरखेरड्यात सिद्धेश्वर मंदिर बुडाले. शेतांना तलावाचे स्वरूप प्राप्त झाल्याने खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

साखरखेर्डा परिसरात सोयाबीन, कपाशी, हळद अक्षरशः पाण्याखाली गेल्याने शेतकरी हैराण झाला आहे.आठवडाभराची उसंत घेऊन पुन्हा पावसाने जोरदार हजेरी लावल्याने भोगावती नदी दुथडी भरून वाहत आहे. भोगावती नदीकाठी असलेल्या सर्व शेतांमध्ये सर्वत्र पाणीच पाणी झाले असून शेतकरी हवालदिल झाले आहेत. रक्षाबंधनाला होणारी कुस्त्यांची दंगलही स्थगित करण्यात आली.

## ताई सकाळी राखी बांध, गिफ्ट देईन गं...
# निष्प्राण हातावर बांधावी लागली राखी

■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. ९ :**
रक्षाबंधनाचा आदला दिवस... वारंवार आपला हात पुढे करीत तो बहिणीला म्हणायचा... ताई, सकाळीच राखी बांध गं, मग मी तुला गिफ्ट देईन... होरे बाबा... म्हणून ती बहिणही लाडीवाळपणे त्याचा मुका घ्यायची...
पण, त्या बिचारीला काय ठावूक की? नियतीच्या मनात काहीतरी वेगळेच असावे . रक्षाबंधनाचा सण सर्वत्र साजरा होत होता, बहिणी आपल्या भावांना ओवाळून राखी बांधत होत्या आणि... त्या घरी मात्र आक्रोश... त्याच्या निपचित पडलेल्या देहाजवळ उभी राहून बहिणीला त्याच्या निष्प्राण हाताला राखी बांधावी लागली.

नाशिक जिल्ह्यातील वडनेर गावात रक्षाबंधनाच्या एक दिवस आधी हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली. गावातील तीन वर्षांचा आयुष भगत याचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला. आयुषची दहा वर्षांची बहीण श्रेयाने अंत्यसंस्कार करण्यापूर्वी भावाच्या मनगटावर राखी बांधून त्याला अखेरचा निरोप दिला. हे दृश्य पाहून उपस्थित प्रत्येकाचे मन हेलावून गेले. ग्रामस्थांनी जड अंतकरणानं चिमुकल्या आयुषला अखेरचा निरोप दिला.



किरण भगत यांचे कुटुंब वडनेर परिसरात वास्तव्यास असून, शेताजनीकच त्यांचे घर आहे. त्यांना श्रेया आणि आयुष अशी दोन मुले आहेत. रक्षाबंधनाच्या आदल्या दिवशी शुक्रवारी रात्री ९ वाजता मळ्यात खेळायला गेलेल्या आयुषवर बिबट्याने हल्ला केला. त्यानंतर तो मुलाला ओढत शेतात घेऊन गेला. जेवणासाठी वडिलांनी आयुषला हाक मारली, पण त्याचा प्रतिसाद मिळाला नाही. मुलगा दिसत नसल्याने कुटुंबीय आणि ग्रामस्थांनी शोधमोहीम सुरू केली.

जवळपास तीन तास सुरू असलेल्या शोधामध्ये ग्रामस्थांसह वन विभाग, श्वानपथक आणि पोलिसांचा सहभाग होता. अखेर रात्री पावणे बारा वाजता ऊसाच्या शेतात रक्तबंबाळ अवस्थेत आयुषचा मृतदेह आढळला.

आयुषच्या निधनाने त्याच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. 'ताई, तू मला सकाळी राखी बांध, मी तुला गिफ्ट देईन' असे आयुषने रक्षाबंधनाच्या आदल्या दिवशी बहिणीला सांगितले होते. परंतु त्या आधीच तो कायमचा दूर गेला. तरीही, बहिणीने त्याची शेवटची इच्छा पूर्ण केली.

श्रेयाने अंत्यसंस्कारापूर्वी आयुषच्या निष्प्राण मनगटावर राखी बांधली. राखी बांधताना तिच्या डोळ्यांतून अश्रूंचा बांध फुटला आणि पाहणारा प्रत्येक जण हेलावून गेला. यावेळी श्रेयाचा आक्रोश पाहून ग्रामस्थांना डोळ्यांतले पाणी थांबवणे अशक्य झाले.

श्रेया रात्रभर भावाच्या आठवणीत रडत होती, तर संपूर्ण वडनेर गाव या दुःखद घटनेने स्तब्ध झाला होता. रक्षाबंधनाच्या दिवशी गोड आठवणींऐवजी अश्रूंची राखी आणि चिमुकल्याचा अकाली मृत्यू ही कायमची जखम बनून राहिली. प्रत्येकजण या घटनेने हळहळला होता.



■ **नागपूर :** *आदिवासी दिनाचे औचित्य साधून शनिवारी नागपूर शहरात आदिवासी समुदायाच्या विविध संघटनांच्यावतिने अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्याचाच एक भाग म्हणून आदिवासी युवक युवतींनी सुरेख नृत्य सादर केले.*

## ➢ महत्त्वाचे

### मुलांच्या भांडणातून प्रौढावर चाकूने वार

**शिरपूर ।** मुलांच्या भांडणाचा वाद टोकाला पोहचल्यानंतर प्रौढावर चाकूने वार करुन प्राणघातक जखमी केल्याची घटना सहा ऑगस्टला दुपारी जुनी सांगवी (ता.शिरपूर) येथे घडली. संशयिताविरोधात सांगवी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. भगवान लक्ष्मण गायकवाड (वय 56, रा.जुनी सांगवी) असे जखमी प्रौढाचे नाव आहे. त्यांचा नातू खुशाल गायकवाड व त्यांच्या गल्लीत राहणारा नागेश एकनाथ गावित यांचा मुलगा सौरभ यांच्यात पाच ऑगस्टला सायंकाळी वाद झाला होता. त्यामुळे सहा ऑगस्टला गायकवाड व त्यांच्या भावांनी नागेश गावित याच्याकडे चौकशी केली. त्याचा राग आल्याने गावित याने त्यांना खुनाची धमकी दिली होती. दुपारी दीडला भगवान गायकवाड गावातील जि.प.शाळेजवळ सीताराम कोळी यांच्या पानटपरीवर बसलेले असतांना संशयित नागेश गावित तेथे पोहचला. त्याने गायकवाड यांना शिवीगाळ करीत त्यांच्या पोटावर व मानेवर चाकूने वार करुन गंभीर जखमी केले. त्यानंतर तो पळून गेला. मधुकर गायकवाड याने भाऊ भगवान गायकवाड यांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. संशयिताविरोधात सांगवी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखलकरण्यातआला.

### सोन्यासारख्या माणसांचा शोध घेणे गरजेचे : पोपटराव देवरे

**नाशिक ।** प्रत्येक गावाच्या उत्कर्षासाठी अनेक व्यक्तींनी स्वतःचं आयुष्य पणाला लावलेलं असतं. अशा व्यक्तिमत्त्वांमुळेच गाव प्रगतिपथाकडे जात राहतं. गावात असणारी अशी सोन्यासारखी माणसं शोधता आली पाहिजे, असे प्रतिपादन कामगारभूषण पोपटराव देवरे यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारकात आयोजित 'पुस्तकावर बोलू काही' या उपक्रमात 'उमराणा भूषण' या पुस्तकावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी दतात्रय जाधव यांनी होते. ते पुढे म्हणाले की, गावाचा इतिहास या पुस्तकाच्या माध्यमातून लिहिल्यामुळे भविष्यात अनेक युवक पीएच.डी करू शकतील, असा ग्रंथ निर्माण झाला आहे. आयुष्यात एखादे काम असे करायचे, की त्यामुळे आपल्यासह आपल्या गावाचे नाव




आयुष्यभर गौरवांकित राहील, असे काम करायचे म्हणून या ग्रंथाची निर्मिती केली. या ग्रंथासाठी गावातील अनेक अनुभवांचे विद्यापीठ असणाऱ्या ज्येष्ठ-श्रेष्ठ नागरिकांची मदत झाली. त्यांच्याकडील अनुभवाची शिदोरी उपयोगाला आली. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी, पु.ल.देशपांडे, पंतप्रधान चंद्रशेखर, स्वाध्यायसूर्य पांडुरंगशास्त्री आठवले, सुनील दत्त यांनी उमराणे या गावाला भेटी दिल्या आहेत. मालेगावचे पहिले खा.यादवराव जाधव, वसाका कारखाना निर्मितीचे शिल्पकार ग्यानदेवदादा देवरे याच भूमीचे पुत्र असल्याने या गावचे कर्तृत्व आणि नेतृत्व या माध्यमातून मांडता आले; याचा अभिमान वाटतो, असेही ते म्हणाले. योगेश कापडणीस आणि विलास गोडसे यांना ग्रंथभेट देऊन सन्मानीत करण्यात आले. सुरेश पवार यांनी सूत्रसंचालन केले तर वैजयंती सिन्नरकर यांनी आभार मानले. दरम्यान येत्या मंगळवारी (दि.१२) प्रा.डॉ.नारायण पाटील 'शोध डॉ.शाम मानवांचा' या पुस्तकावर ऐसपैस गप्पा करणार आहेत.

### वीज बिल डाऊनलोड करण्यासाठी आता 'लॉगिन' अनिवार्य

**नाशिक ।** सायबर सुरक्षितता तसेच वीज ग्राहक माहितीच्या गोपनीयतेसाठी महावितरणच्या लघुदाब वर्गवारीच्या वीजबिलाची पीडीएफ प्रत अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाइन डाऊनलोड करण्यासाठी आता संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत प्रवेश (लॉगिन) करणे अनिवार्य करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या सायबर सुरक्षेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार हा बदल करण्यात आला आहे. महावितरणच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावरील 'वीजदेयक अवलोकन/भरणा' (View/Pay Bill) पेजवर लघुदाब वर्गवारीतील घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर ग्राहकांना चालू महिन्याच्या वीजबिलाची पीडीएफ प्रत ऑनलाइन डाऊनलोड करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र याआधी केवळ १२ अंकी ग्राहक क्रमांक सबमीट करून वीजबिल डाऊनलोड करण्याची सोय उपलब्ध होती. आता नव्या बदलात वीज बिल लॉगिनशिवाय ऑनलाइन भरण्याचा पर्याय खुला ठेवण्यात आला आहे. मात्र पीडीएफ वीजबिल डाऊनलोड करण्यासाठी नोंदणीकृत प्रवेश (लॉगिन) करणे अनिवार्य आहे. लॉगिनची लिंकदेखील 'वीजदेयक अवलोकन/भरणा' (View/Pay Bill) पेजवर उपलब्ध आहे. तसेच ज्या ग्राहकांनी आतापर्यंत लॉगिनसाठी नोंदणी केलेली नाही त्यांनी ग्राहक क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक तसेच ई-मेल (असल्यास) माहिती भरून नोंदणी करणे तसेच प्रवेश नाम (लॉगिन आयडी) व पासवर्ड (परवली शब्द) निश्चित करणे आवश्यक आहे. त्यासाठी देखील लिंक त्याच ठिकाणी उपलब्ध आहे. नोंदणीकृत प्रवेश (लॉगिन) केल्यानंतर स्वतःच्या एकापेक्षा अधिक वीजजोडण्यांसाठी विविध ऑनलाइन सेवा उपलब्ध आहे.

# सप्तश्रृंग गडावर जागतिक आदिवासी दिन, क्रांती दिन उत्साहात साजरा

**सप्तश्रृंग गड ।** आदिवासी सेवा समिती संचलित प.पू.ओम दत्त श्री ठाकूर महाराज माध्यमिक विद्यालय श्री सप्तश्रृंगी गड येथे मुख्याध्यापक शशिकांत देसले यांच्या अध्यक्षतेत उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी क्रांती दिन व आदिवासी दिनाचे महत्व आपल्या वक्तृत्वातून स्पष्ट केले. छोडो भारत गर्जना,करा किंवा मरा या घोषणांसह 8 ऑगस्ट 1942 रोजी सुरु झालेले भारत छोडो आंदोलन म्हणजेच ऑगस्ट क्रांतीचा महिमा वर्णन केला.शशिकांत देसले आपल्या वर्णनात म्हणाले. 9ऑगस्ट हा 'जागतिक आदिवासी दिवस' म्हणून साजरा करण्यात येतो. जगाच्या पाठीवर ज्या माणसाने,ज्या जिवाने पहिल्यांदा जन्म घेतला तो जीव म्हणजे आदिमानव म्हणजेच आदिवासी. आज जगाच्या पाठीवर ज्या काही कला



अस्तित्वात आहेत.त्या सगळ्या कलांचा उद्गाता आदिवासी बांधवआहे. आदिवासी हेच पृथ्वीचे मूलनिवासीआहेतआणि अनेक आदिवासी जमाती भारतात वास्तव्यास आहेत.अवघ्या 25 वर्षाच्या आयुष्यात धरती आबा ही पदवी त्यांनी मिळविली. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांच्या जीवन कार्यावर प्रकाश त्यांनी टाकला. आपल्या उत्कृष्ट संचलनात सिमा गांगुर्डे यांनी आदिवासी समुदायांची रचना,संस्कृती भाषा आणि परंपरा समजून घेण्याची,समर्थन करण्याची आणि जतन करण्याची संधी देणारा हा दिवस आहे.अल्प आयुष्यात आदिवासींसाठी केलेल्या कार्यामुळे अभिमानाने झारखंड या राज्याने बिरसा मुंडा यांचा जन्मदिवस म्हणजेच झारखंडचा जन्मदिवस मानला.ज्या जननायकाचा फोटो आपल्या भारतीय संसदेत झळकलेला आहे, आदिवासी समाजाची भूमिका मांडणारे हे महामानव असे शब्द वापरून त्यांनी विद्यार्थ्यांना संदेश दिला. विद्यार्थ्यांनी आदिवासी वेशभूषेत रॅलीद्वारे परिसरात जागृती केली. संस्कृतिक विभागाने मार्गदर्शन केलेले आदिवासी नृत्य यावेळी सादर करण्यात वकृत्व व आदिवासी नृत्य सादर करणाऱ्या स्पर्धक विद्यार्थ्यांना अध्यक्षांच्या व स्टाफच्या हस्ते शैक्षणिक साहित्य देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.कार्यक्रम यशस्वीतेसाठी संजय ठोके,सतिष बोरसे, विलास पवार,प्रतिभा बोरस्ते,आकाश सोनवणे, अरविंद पवार,कैलास गवळी, वसतिगृह अधीक्षक गोरख भोये, निखिल पाटील यांनी परिश्रम घेतले.

## खासदार कै. गो. ह. देशपांडे वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**नाशिक ।** नाशिक एज्युकेशन सोसायटी नाशिक यांच्या तर्फे दरवर्षी खासदार कै. गो.ह देशपांडे वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते येत्या रविवार (२४ ऑगस्ट २०२५) पेठे विद्यालय येथे ही स्पर्धा होणार असल्याची माहिती मधुवंती देशपांडे यांनी दिली नाशिक एज्युकेशन सोसायटी नाशिक तर्फे खासदार कै.गो.ह देशपांडे वकृत्व स्पर्धा ही दरवर्षी आयोजित करण्यात येत असून स्पर्धेचे हे ५६ वे वर्ष असून नाशिक जिल्ह्यातील अत्यंत प्रतिष्ठित अशी जिल्हास्तरीय स्पर्धा आहे या स्पर्धेत( इ.४ थी),(इ.५ वी ते ७ वी),(इ.८ वी ते १० वी) अशा तीन गटांमध्ये मराठी व इंग्रजी दोन्हीही भाषांतून घेण्यात येणार आहे तसेच इ.८ वी ते १० वी या वर्गासाठी ग्रामीण भागासाठी वेगळा गट करण्यात येतो स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके, उत्तेजनार्थ, स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहेत स्पर्धेची अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी जास्तीत जास्त स्पर्धकांनी मधुवंती देशपांडे (९७६७३७५३५३) यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन संस्था पदाधिकारी व स्पर्धा संयोजकांनी केलेले आहे.

## चिमुकल्यांनी पाठवल्या सीमेवरील जवानांना ४०० राख्या

**निफाड ।** देशाच्या रक्षणासाठी अहोरात्र खडा पहारा देणाऱ्या भारतीय सीमेवरील सर्व जवानांना रक्षाबंधन सणानिमित्त तालुक्यातील पालखेड येथील महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कुल, पालखेड येथील विद्यार्थीनींनी ४०० राख्या पाठवून जवानांबद्दलचे भाऊ-बहिणीचे अनोखे प्रेम जोपासले. राख्या बनविण्यासाठी विद्यालयातील शिक्षकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.याप्रसंगी झालेल्या कार्यक्रमात मुख्याध्यापक अशोक शेळके, निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्दवळे, संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे, सागर जाधव, राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव, संजय कोकतरे, कविता ढोमसे,सारिका पवळे, राहुल दवते, सुरेश गांगुर्डे, रामदास पवार, नदीम तांबोळी आदी उपस्थित होते.सदर उपक्रमात शाळेच्या मुला -मुलींनी सीमेवरील जवानांना पत्र पाठवून त्यात आम्हा सर्वांचे आयुष्यही या धाडसी,शूर व जिगरबाज जवानांना लाभो तसेच सैनिकांबद्दल अतिशय चांगल्या स्वरूपाचे गुणगान गायले असून अश्या स्वरूपाची मनोमन प्रार्थना देखील विद्यार्थांनी यावेळी देवाकडे केली आहे, याप्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक- शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन संदीप आहेर यांनी तर आभार संजय लव्हांगडे यांनी मानले.

> सदर उपक्रमाद्वारे विद्यार्थीदशेतच सैनिकांप्रती असलेली कृतज्ञता, आपुलकी,आत्मीयता प्रकट होऊन राखीच्या एका धाग्याने विद्यार्थ्यांचे आपल्या शूर सैनिकांशी अतूट असे नाते जोडले जावे. तसेच सैनिकांमध्ये असलेले शौर्य व शिस्त याबद्दल आदरभाव व देशप्रेम निर्माण होऊन सुजाण नागरिक घडावेत, अशी अपेक्षा आहे.
>
> **-अशोक शेळके, मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कुल, पालखेड**

## 'छावा' चित्रपटाचा हिंदी, मराठी भाषेतील वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर १७ ऑगस्टला

**नाशिक ।** सर्वात चर्चित ब्लॉकबस्टर "छावा" चित्रपटाचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर येत्या १७ ऑगस्ट रोजी, रविवार, रात्री८ वाजता स्टार गोल्ड वाहिनीवर होणार आहे. पहिल्यांदाच स्टार गोल्ड वाहिनीवर प्रेक्षकांना छावा मराठीत आणि हिंदीत पाहता येणार आहे. निवडक ऑपरेटरद्वारे हा चित्रपट आता मराठीमध्ये घरबसल्या प्रेक्षकांना पाहता येणारअसून, ज्यात छत्रपती संभाजी महाराजांची कथा त्यांच्या मातृभाषेत घरोघरी पोहोचणार आहे.




हा ऐतिहासिक चित्रपट छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रमी पुत्र छत्रपती संभाजी महाराज यांच्या अद्वितीय जीवनप्रवासाला पडद्यावर जिवंत करतो, ज्यांच्या पराक्रमाने भारतीय इतिहासाची दिशा घडवली. प्रभावी मांडणी आणि भावस्पर्शी कथा यांचा संगम असलेल्या छावा चित्रपटाचे दिग्दर्शन लक्ष्मण उतेकर यांनी केलं आहे. या चित्रपटात विक्की कौशल यांनी छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारताना त्यांचा मुघलां विरुद्धच्या स्वातंत्र्य लढ्यातील शौर्याला विलक्षण जिवंतपणा दिला आहे. त्यांच्यासोबत रश्मिका मंदाना (महाराणी येसुबाई), अक्षय खन्ना (औरंगजेब), दिव्या दत्ता (सोयराबाई), विनीत कुमार सिंह (कवी कलश) आणि आशुतोष राणा (हंबीरराव मोहिते) अशा दमदार कलाकारांनीही प्रभावीआणि वास्तवदर्शी भूमिका साकारल्या आहेत, ज्या या गाथेच्या भव्यतेला न्याय देतात. ८०० कोटी रुपयांहून अधिक जागतिक कमाई करून छावा चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर नवा इतिहास रचला आहे आणि आता या स्वातंत्र्यदिनाच्या वीकेंडला ही कथा घराघरांत पोहोचणार आहे. विक्की कौशल म्हणाले, छावा हा चित्रपट आता मराठीत देखील प्रीमियर होत आहे, ही माझ्यासाठी तसेच सर्व मराठी भाषिकांसाठी मोठ्या अभिमानाची गोष्ट आहे. ही कथा पडद्यावर आणणे हा कारकिर्दीतील सर्वात मोठा सन्मान आहे. मनापासून स्वतःला या भूमिकेत झोकून दिले आणि खात्री आहे की ही गाथा प्रेक्षकांना मनापासून भावेल. रश्मिका मंदाना म्हणाल्या, "महाराणी येसुबाईंची भूमिका साकारणे माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट होती. महाराणी येसुबाई ह्या अपार सामर्थ्य, धैर्य व कणखरता असलेल्या एक सशक्त स्त्री होत्याच तसेच छत्रपती संभाजी महाराजांच्या आयुष्यातील खऱ्या आधारस्तंभ होत्या. त्यांच्या कथेचा भाग होणे, विशेषतः अशा ऐतिहासिक चित्रपटातून, ही एक अविस्मरणीय अनुभूती आहे. दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर म्हणाले, छावा हा केवळ एक चित्रपट नाही तर तो छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य आणि आत्म्याला दिलेली सलामी आहे. ही ऐतिहासिक गाथा प्रत्येक घरात आणि हृदयात स्थान मिळवेल. स्टार गोल्डचे प्रवक्ते म्हणाले, "स्टार गोल्ड नेहमीच दर्जेदार मनोरंजन प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यात आघाडीवर राहिला आहे आणि छावा हा भारतातील घराघरांत पोहोचणारा पुढचा भव्य चित्रपट ठरणार आहे. ताकदीची कथा, उत्कृष्ट अभिनय आणि सिनेमाची भव्यता यामुळे हा चित्रपट प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करेल.

## होरायझन इंटरनॅशनल अकॅडमीमध्ये विद्यार्थी शपथविधी समारंभ



**नाशिक ।** मविप्रच्या अश्विन नगर येथील होरायझन इंटरनॅशनल अकॅडमीमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी नव्याने निवडून आलेल्या विद्यार्थी प्रतिनिधींचा शपथविधी समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मविप्र समाज संस्थेचे संचालक ॲड. लक्ष्मण लांडगे, शिक्षणाधिकारी डॉ. के. एस. शिंदे आणि प्रा. डी. डी. जाधव उपस्थित होते.या मान्यवरांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे नेतृत्व स्वीकारण्याची प्रेरणा मिळाली. स्थानिक व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सोनाली राजे पवार यांच्यासह शालेय व्यवस्थापन समिती, माता पालक संघ व पालक-शिक्षक संघाचे सदस्यही उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने झाली, त्यानंतर नव्याने निवडून आलेल्या विद्यार्थ्यांच्या नेतृत्त्वाखाली भव्य मार्च पास्टचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याने निष्ठा, प्रामाणिकपणा व सेवाभावाने जबाबदारी पार पाडण्याची शपथ घेतली. मुख्याध्यापिका पूनम सिंग यांनी सर्व नवनियुक्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व शिस्त, संघभावना व नेतृत्व यांचे महत्त्व समजावून सांगितले. विद्यार्थ्यांमध्ये एकात्मता व जबाबदारीची भावना अधिक बळकट करण्यासाठी हा हा समारंभ प्रेरणादायी क्षण ठरल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

## नाफेड-एनसिसिएफ कांदा खरेदीत कोट्यवधींचा घोटाळा

### ५० केंद्रांवर भरारी पथकांची छापेमारी

**नाशिक ।** नाफेड आणि एनसिसिएफ या संस्थांच्या कांदा खरेदी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार आणि अनियमितता उघडकीस आली आहे. भांवातर योजनेअंतर्गत नाशिक जिल्ह्यात सुमारे तीन लाख टन कांदा खरेदीचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. मात्र, ५ ऑगस्टपर्यंत झालेल्या खरेदीत बोगस सातबाऱ्यांवर नोंदी, नियमांचे उल्लंघन आणि आर्थिक गैरव्यवहार आढळल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.




केंद्रीय तसेच राज्य शासनाच्या सहकार व पणन विभागाच्या आदेशानुसार जिल्हा उपनिबंधक फयाज मुलाणी यांच्या नेतृत्वाखाली नऊ भरारी पथके गठीत करण्यात आली. या पथकांनी मागील आठवड्यात आणि सोमवारी जिल्ह्यातील ५० खरेदी केंद्रांवर अचानक छापेमारी केली. नाफेडच्या २८ आणि एनसिसिएफच्या ३२ केंद्रांवर- ज्यात खाजगी तसेच विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचा समावेश होता- तपासणी करण्यात आली.



तपासादरम्यान, दिवाळखोरीत गेलेल्या काही सहकारी संस्थांना देखील शासकीय खरेदीचे परवाने देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला. सहकार आणि पणन विभागाची संमती न घेता नाफेड आणि एनसिसिएफने अशा बोगस संस्थांना खरेदी परवाने कसे दिले, हा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राज्य समन्वयक कुबेर जाधव यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेऊन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय वाणिज्य मंत्री पियूष गोयल यांच्याकडे तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. त्यांनी या खरेदी प्रक्रियेतील ७० ते ३० टक्के व्यवहार बोगस असल्याचा दावा करत, सर्व ५० केंद्रांच्या पोर्टलवरील व्यवहारांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. जाधव यांनी स्पष्ट केले की, नाफेड आणि एनसिसिएफच्या तथाकथित खरेदीमुळे बाजारभावात ५०० ते ६०० रुपयांची घसरण झाली असून, शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे भविष्यात या दोन्ही संस्थांमार्फत होणारी कांदा खरेदी तात्काळ बंद करण्याची गरज आहे.

## मनमाड एमआयडीसी प्रकल्पाला अधिकृत औद्योगिक वसाहतीचा दर्जा

**मनमाड ।** मनमाडकरांसाठी एक ऐतिहासिक क्षण ठरावा असा महत्त्वपूर्ण निर्णय नुकताच घेण्यात आला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला मनमाड एमआयडीसी प्रकल्पाला महाराष्ट्र शासनाने अधिकृत औद्योगिक वसाहतीचा दर्जा बहाल केला आहे.

आमदार सुहास कांदे यांनी मनमाडकरांसाठी एमआयडीसी प्रकल्पाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. त्यांनी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला असून महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिज विभागामार्फत मनमाड एमआयडीसीला अधिकृत मान्यता देणारा शासन निर्णय (जीआर) जाहीर करण्यात आला आहे. हा निर्णय शासनाचे सहसचिव डॉ. श्रीकांत फुलकुंडवार यांच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध झाला असून तो महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात भाग चार 'ब' मध्ये प्रकाशित करण्यात येणार आहे.

मनमाड-औरंगाबाद मार्गालगत असलेल्या अनकवाडे व सटाणे (ता. नांदगाव) येथील एकूण १२४.०८ हेक्टर क्षेत्रफळ औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आले आहे. यामध्ये खाजगी ११९.७९ हेक्टर व सरकारी ४.२९ हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे. ही अधिसूचना महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अंतर्गत प्रकरण ६ व कलम २(ग) नुसार काढण्यात आली आहे. औद्योगिक क्षेत्राच्या सीमा पूढील प्रमाणे आहेत. अनकवाडे व मौजे सटाणे या दोन्ही गावांच्या चतु:सीमा आशा, अनकवाडे सीमा - उत्तर:




गट नंबर १४२, १४०, १३९, मनमाड-औरंगाबाद मार्ग, सटाणे गावची सीमा, दक्षिण : वसंतनगर (ता. येवला) गावची सीमा, पूर्व : वंजारवाडी गावची सीमा, पश्चिम : मनमाड-औरंगाबाद लोहमार्ग व अहमदनगर-मनमाड महामार्ग, सटाणे सीमा : उत्तर : गट नंबर ७५, मौजे मनमाड गट नंबर १२७, १२८, मनमाड ते सटाणे (वंजारवाडी) रस्ता दक्षिण : अनकवाडे गावची सीमा, पूर्व : गट नंबर ६५/१, ४५ पैकी, ४०, ९८, ३८, ३७, ३६ व नाला, पश्चिम : मनमाड-औरंगाबाद लोहमार्ग. या निर्णयामुळे मनमाड व परिसरातील हजारो बेरोजगार युवक-युवती, लघु व मध्यम उद्योजक, व्यापारी आणि व्यावसायिकांना नवीन उद्योग सुरू करण्यासाठी सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे. एमआयडीसीच्या माध्यमातून औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक वाढण्याची अपेक्षा असून, त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

## महत्त्वाचे

### प्रहार दिव्यांग संघटनेकडून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे स्वागत

**नाशिक ।** नाशिक जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांची प्रहार दिव्यांग संघटनेच्या शिष्टमंडळाने सदिच्छा भेट घेऊन शुभेच्छा



दिल्या. ग्रामीण भागातील दिव्यांगांच्या समस्या व अडचणी संदर्भात बैठक आयोजित करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद देत बैठकीचे आश्वासन दिले या प्रसंगी प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष ललित पवार, कार्याध्यक्ष बबलु मिर्झा, सरचिटणीस सुभाष निकाळजे, दीपक भोई उपस्थित होते.

### आज दुपारपासून त्र्यंबकेश्वरला खासगी वाहनांना बंदी

नाशिक : तिसऱ्या श्रावण सोमवार निमित्त त्र्यंबकेश्वर येथे दर्शन व ब्रह्मगिरी प्रदक्षिणा फेरीसाठी होणारी लाखो भाविकांची गर्दी लक्षात घेता रविवारी (दि.१०) दुपारी बारा वाजेपासून ते सोमवारी रात्री दहा वाजेपर्यंत नाशिकहून त्र्यंबकेश्वरकडे सर्व प्रकारच्या खासगी वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. ग्रामीण पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील, अपर अधिक्षक आदित्य मिरखेलकर यांनी या संदर्भातील अधिसूचना जारी केली आहे. त्यात तिसरा श्रावण सोमवार निमीत्त त्रंबकेश्वर मंदिर येथे तसेच त्रंबकेश्वर ब्रम्हगीरी पर्वतावर फेरीसाठी जिल्हयातुन, राज्यातुन व परराज्यातुन भाविक येणार असल्याने त्रंबकेश्वर शहरात होणारी गर्दी टाळण्यासाठी वाहतुक मार्गात बदल व भाविकांच्या वाहनांची बाहय पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे. त्यानुसार रविवारी दुपारी बारा वाजेपासून ते सोमवारी रात्री दहा वाजेपर्यंत नाशिक कडून त्रंबकेश्वर मार्गे जव्हार येथे जाणारी व जव्हारकडून त्रंबकेश्वर मार्ग नाशिकडे येणारे सर्व प्रकारच्या खाजगी वाहनांना (एसटी बस वगळून) त्रंबकेश्वर शहरात प्रवेश बंद करण्यातआलेलाआहे.

### सव्वादोन लाखाची लाच घेताना दिंडोरीत दोन अभियंते जाळ्यात

**नाशिक ।** पाणीपुरवठा योजनेचे मंजूर केलेल्या बिलाच्या आणि प्रलंबित बिल मंजूर करण्याच्या मोबदल्यात दोन लाख १६ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिंडोरी येथील पाणीपुरवठा योजनेचे उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांना रंगेहाथ पकडले. उपअभियंता योगेश नारायण घारे (वय ४४, रा. ६०१., तरुमाला भूमिका, बी विंग, द्वारका), कनिष्ठ अभियंता मनीष कमलाकर जाधव (२९, रा. कुंजविहार सोसायटी, हिरावाडी) अशी लाचखोरांची नावे आहेत. तक्रारदार शासकीय ठेकेदार असून, त्यांनी सावरपाडा (ता. दिंडोरी) येथे जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजनेंतर्गत शिवारपाडा येथील यापूर्वी केलेल्या कामाचे तसेच सध्याच्या प्रलंबित असलेल्या कामाचे बिल मंजूर करण्यासाठी त्यांच्याकडे दोन लाख १६ हजारांची लाच मागितली होती. उपअभियंत्यांना लाचेची रक्कम स्वीकारताना सापळा अधिकारी अमोल वालझाडे, स्वप्नील राजपूत, हवालदार संदीप हादंगे, सुरेश चव्हाण, किरण धुळे, परशुराम जाधव यांच्या पथकाने रंगेहाथ पकडले. लाचखोर अभियंत्याच्या घराची झडती घेण्यात आली. ही कारवाई पोलिस अधीक्षक भारत तांगडे, अपर अधीक्षक माधव रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

### बिबट्याच्या हल्ल्यात बालकाचा मृत्यू

**नाशिक ।** देवळाली आर्टिलरीत बिबट्याच्या हल्ल्यात एका ३ वर्षीय बालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. आयुष किरण भगत असे या दुर्दैवी बालकाचे नाव असून, गुरुवारी (८ ऑगस्ट) रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. आयुष आपल्या घराच्या अंगणात खेळत असताना अचानक बिबट्याने त्याच्यावर झडप घातली. हल्ल्यानंतर बिबट्याने त्याला ओढत-फरफटत जवळील दाट झुडपात नेले.चार तासांचा शोध, अखेर दुर्दैवी शेवट हल्ल्यानंतर आयुष दिसेनासा झाल्याने कुटुंबीय आणि ग्रामस्थांनी परिसरात शोधमोहीम सुरू केली. काही वेळात वन विभाग आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले. तब्बल साडेतीन ते चार तासांच्या शोधानंतर आयुषचा मृतदेह आढळून आला. गेल्या काही दिवसांपासून या भागात बिबट्याचे वारंवार दर्शन होत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे. वडनेर-पिंपळगाव रोड रेंजरोड भागात तसेच शेतवस्त्यांवर बिबट्यांच्या हालचालींमुळे भीतीचे वातावरण कायम आहे. नागरिकांनी वारंवार पिंजरा लावून बिबट्याला पकडण्याची मागणी केली असली तरी, ती अद्याप पूर्ण झालेली नाही, असा स्थानिकांचा आरोप आहे या घटनेनंतर ग्रामस्थांनी वन विभागावर दुर्लक्षाचा आरोप करत संताप व्यक्त केला आहे. "वारंवार बिबट्यांचे दर्शन होत असतानाही आणि जिवाला धोका असतानाही योग्य ती कारवाई केली नाही. यामुळेच आज एका चिमुकल्याचा जीव गेला," असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.परिसरातील नागरिकांनी वन विभागाने तातडीने पिंजरे लावून बिबट्यांना जेरबंद करावे, ससेच गावात आणि शेतवस्त्यांवर सतत गस्त ठेवावी, अशीमागणीकेलीआहे.

# माजी नगरसेवक यशवंत निकुळे यांच्यावरचा आरोप मागे; तक्रारदाराचा कबुली जबाब

## पिस्तूल रोखल्याचा आरोप खोटा ठरला

**नाशिक ।** वाहनाला कट लागल्याच्या किरकोळ कारणावरून पिस्तूल रोखल्याचा आरोप करत नाशिकमध्ये खळबळ माजवणाऱ्या प्रकरणाला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. या घटनेत भाजपचे माजी नगरसेवक यशवंत निकुळे यांच्या विरोधात इंदिरानगर पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, हा प्रकार गैरसमजातून झाल्याचे तक्रारदार डॉ. राहुल धीरेंद्र सिंग यांनी कबूल करत तक्रार मागे घेतली आहे. त्यामुळे दोघांमधील वाद सामोपचाराने मिटविण्यात आला असून निकुळे यांनी विनाकारण बदनामी झाल्याची खंत व्यक्त केली आहे.



५ ऑगस्ट रोजी सकाळी सुमारे सातच्या सुमारास डॉ. राहुल सिंग हे पाथर्डी फाट्यावरून दुचाकीवरून जात होते. समर्थ को-ऑपरेटिव्ह बँकेजवळील डे केअर स्कूलकडे जाणाऱ्या रस्त्यावर विरुद्ध दिशेने येणाऱ्या एमएच १५ जेएम ८६८४ या क्रमांकाच्या ईरटीगा गाडीमुळे त्यांच्या दुचाकीला कट लागला. या किरकोळ कारणावरून डॉ. सिंग आणि यशवंत निकुळे यांच्यात शाब्दिक वाद झाला.

वाद इतक्यावरच न थांबता, डॉ. सिंग यांनी थेट इंदिरानगर पोलीस ठाण्यात जाऊन, निकुळे यांनी पिस्तूल रोखून धमकावल्याचा गंभीर आरोप केला. तक्रारीवरून पोलिसांनी निकुळे यांच्या विरोधात अदखलपात्र गुन्हा नोंदवला. घटनेची बातमी पसरताच संपूर्ण शहरात एकच खळबळ उडाली.परंतु हा प्रकार राजकीय वैमनस्यातून घडवून आणल्याची चर्चा सुरू झाली. निकुळे हे उच्चशिक्षित, साध्या कुटुंबातून पुढे आलेले, स्वभावाने मितभाषी आणि इतरांच्या भावना जपणारे व्यक्तिमत्व म्हणून परिचित आहेत. त्यामुळे त्यांच्याकडे पिस्तूल असण्याची शक्यता नसल्याच्या प्रतिक्रिया नागरिकांतून उमटल्या. घटनेनंतर निकुळे यांनी माध्यमांमार्फत आपली भूमिका मांडली. आरोपांमुळे ते भावनिक झाले होते. त्यांनी आपल्यावर झालेले आरोप निराधार असल्याचे सांगून, हा प्रकार आपली प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न असल्याचेही स्पष्ट केले. पोलिस तपासादरम्यान व चर्चेनंतर, डॉ. राहुल सिंग यांनी स्वतःच हा प्रकार गैरसमजातून झाल्याचे कबूल केले. त्यांनी पोलीस ठाण्यात येऊन, दिलेली तक्रार सामोपचाराने मागे घेतली. त्यामुळे यशवंत निकुळे यांच्यावरील आरोप मागे घेण्यात आले असून, या संपूर्ण प्रकरणावर पडदा पडला आहे.हा निकाल लागल्यानंतर नागरिकांमध्येही समाधान व्यक्त होत असून, पोलिसांनी दोन्ही पक्षांना भविष्यात अशा घटना टाळण्याचा सल्ला दिला आहे.



> अत्यंत सामान्य कुटुंबात जन्म झाल्याने गरिबी आणि बिकट परिस्थितीचा सामना करत आम्ही आयुष्यात पुढे आलो. या सर्व अडचणींवर मात करून उच्च शिक्षण संपादन केले आणि समाजात आपले स्थान निर्माण केले. आमची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. राजकारणात असूनही आम्ही नेहमीच समाजकारणाला प्राधान्य दिले आहे. जनसामान्यांच्या अडचणी सोडविणे हेच आमचे ध्येय राहिले आहे. माझ्यावर झालेले आरोप हे खोटे असल्याचे सिद्ध झाले असून 'सत्याचाच विजय होतो' याचा प्रत्यय या प्रकरणातून आला आहे. तक्रारदारांनी तक्रार मागे घेतल्याने अनेक राजकीय विरोधकांचे मनसुबे उधळले गेले आहेत.
>
> **– यशवंत निकुळे, माजी नगरसेवक**

## विलास शिंदे यांच्यावर संपर्कपदाची जबाबदारी

**नाशिक ।** गेल्या महिन्यात ठाकरे गटाच्या महानगरप्रमुखपदाचा राजीनामा देवून पक्षात दाखल झालेले विलास शिंदे यांच्यावर पक्षाने प्रभारी संपर्क प्रमुखपदाची जबाबदारी सोपविली आहे.



विलास शिंदे हे ठाकरे गटातील निष्ठावंत शिवसैनिक म्हणून परिचीत होते. विलास शिंदे यांच्यावर पक्षाने अविश्वास दाखविला व खुद्द शिंदे हे देखील जिल्हाप्रमुख पद न मिळाल्याने नाराज होते. त्यामुळे त्यांनी महानगरप्रमुखपदाचा राजीनामा देवून शिंदे सेनेत प्रवेश केला होता. त्यांचे नाव जिल्हाप्रमुख पदासाठी चर्चेत असतांना पक्षाने त्यांच्यावर महापालिका क्षेत्रात प्रभारी संपर्क प्रमुखपदाची जबाबदारी सोपविली आहे. दरम्यान, या संदर्भात विलास शिंदे यांच्याशी संपर्क साधला असता, पक्षनेते एकनाथ शिंदे यांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी येणाऱ्या निवडणूकीत पक्षाचा झेंडा फडकविण्यासाठी जीवाचे रान करणार असल्याची प्रतिक्रीया व्यक्त केली आहे.

## नाशिकरोड बसस्थानकात महिलांचे दागिने लंपास

**नाशिक ।** रक्षाबंधनानिमित्त भावाकडे जाणाऱ्या दोन बहिणीच्या पर्समधून तब्बल पाच तोळ्यांचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम अज्ञात चोरट्याने लांबविल्याची घटना नाशिकरोड बस स्थानकात घडली. यावेळी बस मधील प्रवासी सह नाशिकरोड पोलीस ठाण्यात आणून सर्वांची तपासणी करण्यात आली. मात्र काही मिळून आले नाही. कुसुम भालेराव (रा. जेलरोड) यांच्या पसंमधून दोन तोळे वजनाचे कानातले आणि तीन हजार रोख रक्कम, तर ज्योती जेजुरकर (रा. माडसांगवी) यांच्या पसंमधून साडेतीन तोळ्यांची सोन्याची पोत असा एकूण पाच तोळ्यांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला. दोन्ही महिला नाशिकहून शिर्डीकडे जाणाऱ्या मुंबई- शिर्डी बसने प्रवास करण्यासाठी बसमध्ये बसल्या, तेव्हा गर्दी चा फायदा घेऊन अज्ञात चोरट्यांनी चोरी केली, दागिने चोरीस गेल्याचे लक्षात आल्याने महिलांनी आरडाओरडा केला, यानंतर बस तातडीने नाशिकरोड पोलीस ठाण्यात आणण्यात आली व सर्व प्रवाशांची चौकशी करण्यात आली.



# चाळीसगाव येथील चर्चमध्ये जाण्यासाठी निघालेल्या वाहनाचा भीषण अपघात

**मनमाड ।** शनिवारी दुपारी बारा वाजेच्या सुमारास मनमाड - नांदगाव रस्त्यावरील पानेवाडी गावाजवळ टँकरने ओव्हरटेक करून पानेवाडी गावात शिरण्यासाठी वळण घेत असताना चार चाकी वाहनाने धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये चार चाकी वाहनातील चारही जणांना हाता पायाला आणि डोक्याला गंभीर दुखापत झाली. यापैकी एक महिला गंभीर जखमी झाली आहे. मनमाड उपजिल्हा रुग्णालयात या अपघातग्रस्तांना उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी नाशिक येथे हलविण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,चाळीसगाव येथे चर्चमध्ये जाण्यासाठी मनमाडहून चाळीसगाव कडे निघालेल्या गाडी क्रमांक एमएच-४१ एझेड ८८७६ या गाडीला पानेवाडी गावाजवळ हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनीचे इंधन वाहतूक करणारे टँकर क्रमांक एमएच - २० ईएल ४७२२ या गाडीने समोर जाणाऱ्या चार चाकी वाहनाला ओव्हरटेक करून पानेवाडी गावात शिरण्यासाठी वळण घेत असताना चार चाकी वाहनाने धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये चार चाकी वाहनातील कौशल्याबाई प्रकाश लहिरे, वय ५०, रेल्वे क्वार्टर, सुनंदा रविकांत स्लोधर, वय ५०, रेल्वे क्वार्टर, सुनिता किरण बनसोडे, वय ५८, कॅम्प, रोहन रविकांत स्लोधर, कॅम्प यांच्या हाता पायाला आणि डोक्याला दुखापत झाली असून मनमाड येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार करू पुढील उपचारासाठी नाशिक येथे हलवण्यात आले आहे. या अपघातामध्ये सुनंदा रविकांत स्लोधर हे अति गंभीर जखमी आहेत. याप्रकरणी मनमाड पोलीस स्थानकात अपघाताचा गुन्हा दाखल असून पुढील तपास पोलीस निरीक्षक विजय करे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी करीत आहे.

## अपप्रवृत्तीच्या विरोधात आदिशक्ती प्रतिष्ठानचा पुढाकार

### पोलिसांकडून गंभीर दखल; सुक्षिततेची हमी



**इंदिरानगर ।** इंदिरानगर या शांतताप्रिय व संस्कृती वैभव सातत्याने जपणाऱ्या नगरात अनेक दिवसांपासून काही विकृत प्रवृत्तीचे लोक अश्लील आणि त्रासदायक वर्तन करत असल्याने परिसरातील महिला, युवतींमध्ये अस्वस्थतेचे आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गेल्या महिन्याभरात इंदिरानगर परिसरात महिलांना व ज्येष्ठ नागरिकांना त्रास देण्याचे प्रकार सुरू आहेत. पाठीत मारणे, डोक्यात मारणे तसेच महिलांसमोर अश्लील चाळे करण्याचे गंभीर प्रकार घडत आहेत. या घटनांनी परिसरातील नागरिक, विशेषतः महिला अत्यंत भयभीत झाल्या असून, त्यांना अस्वस्थ आणि असुरक्षित वाटत आहेत. या प्रकारांविरोधात परिसरातील महिलांनी आदिशक्ती प्रतिष्ठानच्या अध्यक्ष तथा भाजपा उपाध्यक्ष संध्या कुलकर्णी यांना घडत असलेला प्रकार सांगितला. त्यांच्या पुढाकाराने नागरिकांनी इंदिरानगर पोलिसठाण्यात तक्रार नोंदवली. या तक्रारीची इंदिरानगर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक तृप्ती सोनवणे यांनी गांभीर्याने दखल घेतली. विशेष बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत सर्व तक्रारींची गांभीर्याने दखल घेत संबंधित अज्ञात व्यक्तींवर लवकरात लवकर कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिले. यावेळी संध्या कुलकर्णी यांच्यासह परिसरातील महिला उपस्थित होत्या.

## नाईक महाविद्यालयात भूगोल विषयातील करिअर संधीवर व्याख्यान

**नाशिक ।** येथील क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेच्या कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात भूगोल विभागांतर्गत "भूगोल विषयातील करिअरच्या संधी" या विषयावर सासवड (पुणे) येथील गुरुकुल अकॅडमीचे संचालक प्रा. संदीप टिळेकर यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान प्राचार्य डॉ. संजय सानप यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते.



या कार्यक्रमासाठी गुरुकुल अकॅडमीच्या संचालिका टिळेकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भूगोल विभाग प्रमुख डॉ.बाळासाहेब चकोर होते. प्रमुख पाहुण्यांच्या परिचय डॉ. राजेंद्र झोळेकर यांनी केला. आपल्या मार्गदर्शनात प्रा.संदीप टिळेकर असे म्हणाले की विद्यार्थ्याने शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञान प्राप्त करून विविध कौशल्य विकसित करणे व त्यातून नोकरीच्या संधीसह उद्योग व्यवसायाच्या संधीकडे सुद्धा अधिक लक्ष दिले गेले पाहिजे. भूगोलशास्त्रामध्ये पर्यटन क्षेत्र, सर्वेक्षण क्षेत्र, शिक्षण क्षेत्र आणि स्पर्धा परीक्षेमार्फत वेगवेगळ्या विभागात नोकरीच्या संधी आहे. त्या संधीचा शोध विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे व त्या अनुषंगाने आपल्या ज्ञानच्या कार्यक्षेत्रा रुंदवल्या पाहिजे. नोकरीबरोबरच विद्यार्थ्यांनी आपल्यातील कला कौशल्य विकसित करून उद्योग व्यवसायात पदार्पण करणे ही काळाची गरज आहे. याप्रसंगी प्राध्यापिका टिळेकर म्हणाल्या की, शिक्षणाने व्यक्ती घडतो. वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांसाठी प्रयत्न करताना विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भयपणे व दूरदृष्टी ठेवून अभ्यास करावा. अध्यक्षीय मनोगतात डॉ.बाळासाहेब चकोर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी एकनिष्ठेने व सातत्यपूर्ण अभ्यास केल्याने कुठल्याही स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.स्नेहल कासार यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.आशाली खारके यांनी केले. कार्यक्रमास प्रा.दिग्विजय गायकवाड, प्रा.तेजल सावळे, प्रा. स्वप्निल धात्रक यांच्यासह भूगोल विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.



## अपघातग्रस्त विद्यार्थ्यांच्या मदतीला धावले शालेय शिक्षणमंत्री

**नाशिक ।** मुंबई-आग्रा महामार्गावर शुक्रवारी (दि.८) सायंकाळी पिक व्हॅनच्या धडकेत ७ ते ८ शाळकरी मुले जखमी झाले. याच सुमारास ओझर विमानतळ येथून मालेगावकडे जात असताना शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांना या अपघाताची माहिती मिळाली. त्यांनी तातडीने घटनास्थळ गाठले. तसेच जखमींच्या मदतीसाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशा सूचना आरोग्य यंत्रणेला दिल्या. तसेच या अपघातामुळे संतप्त नागरिकांच्या भावना जाणून घेतल्या. तसेच त्यांनी रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली.

# इंदिरानगर पोलिसांची कामगिरी; चेन स्नॅचिंग करणारे दोघे ताब्यात




**नाशिक ।** नाशिक शहरात वाढत असलेल्या चैन स्नॅचिंगच्या वाढत्या घटनांमुळे इंदिरानगर पोलीस ठाणे हद्दीत चैन स्नॅचिंग अनुषंगाने गस्त घालत असताना पोलिसांनी दोन संशयितांना पाठलाग करून ताब्यात घेतले आहे.मयुर दिनेश बजरंग व जिग्नेश उर्फ जुगनू दिनेश घासी (रा. छारानगर, कुबेरनगर, रेल्वेस्टेशन, सरदारग्राम,अहमदाबाद गुजरात) अशी ताब्यात घेण्यात आलेल्यांची नावे आहेत.

गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक संतोष फुंदे, पोलीस अंमलदार सागर परदेशी, योगेश जाधव, सागर कोळी, अमोल कोथमिरे, जयलाल राठोड व प्रमोद कासुदे असे गुन्हेशोध वाहनासह गस्त करीत असतांना वडाळा गांव परिसराकडुन रविशंकर मार्ग कडे जात असतांना मदीना लॉन्स, जवळ एक दुचाकी ही वडाळागांव कडुन डी.जी.पी नगर दिशेने विना नंबर प्लेट तसेच मोटार सायकलवरील चालवणारे इसमामे हेल्मेट घातलेले व पाठीमागील इसम हा मास्क व टोपी परिधान केलेला दिसला. त्यांची हालचाला ह्या संशयास्पद असल्याचे दिसले. गुन्हे शोध पथकाने त्यांचा पाठलाग करून त्यांना मोटारसायकल थांबविण्यास सांगितले असता त्यांनी दुचाकी भरधाव वेगाने चालवुन घेवुन जात असतांना गुन्हे शोध पथकाने त्यांचा पाठलाग करुन त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला असता एका सदर रस्त्यावर असलेल्या एका गतीरोधकावर त्यांचा वेग कमी झाल्याने त्यांची मोटासायकल थांबविण्यात यश आले परंतु ते मोटारसायकल सोडुन पळून जाण्याचे प्रयत्नात असतांना त्यांचा पाठलाग करुन ताब्यात घेतले.त्यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी उपनगर पोलीस ठाणे हद्दीत एक चेन स्नॅचिंग केल्याची कबुली दिली असुन ते नाशिक शहरात चेन स्नॅचिंग करिता आले होते व रस्त्याने एकटी असलेल्या गळ्यात सोने घातलेल्या महिलेच्या शोधात होते परंतु त्याअगोदरच इंदिरानगर पोलीस ठाण्याचे गुन्हे शोध पथकाने त्यांना थरारक पाठलाग करुन ताब्यात घेतले आहे.

# जीएसटीमध्ये हव्या काही सुधारणा

**जीएसटी प्रणालीने भारताच्या अप्रत्यक्ष कर रचनेत क्रांतिकारी बदल घडवला असला, तरी त्यात अजूनही अनेक संरचनात्मक आणि प्रक्रियात्मक समस्या आहेत. त्याकडे त्वरित लक्ष देऊन सुधारणा करणे आवश्यक आहे. जीएसटी करात सुसूत्रता आणता आली नाही. आठ वर्षानंतरही एक देश, एकच कर ही प्रणाली खऱ्या अर्थाने लागू होऊ शकली नाही. त्यातही जीएसटी कररचनेत सामान्यच अधिक भरडला जात आहे.**



परामर्श
**हेमंत देसाई,** ज्येष्ठ पत्रकार

जून महिन्यामध्ये वस्तू आणि सेवाकर अर्थात जीएसटी संकलन एक लाख ८४ हजार कोटी रुपयांवर पोहोचले. वार्षिक तुलनेत ते ६.२ टक्क्यांनी वाढले, तरी आधीच्या सलग दोन महिन्यांमध्ये नोंदवलेल्या दोन लाख कोटी रुपयांच्या संकलनाच्या तुलनेत घसरले. जून २०२४ मध्ये जीएसटी संकलन एक लाख ७३ हजार कोटी रुपये होते. त्या आधीच्या महिन्यात ते एक लाख एक हजार कोटी रुपये तर एप्रिल २०२५ मध्ये दोन लाख ३७ हजार कोटी इतके होते. हे पाहता, मासिक आधारावर जीएसटी संकलनात जवळपास ८.५ टक्क्यांची घट झाली आहे. देशांतर्गत व्यवहारांमधून मिळणारा एकूण जीएसटी महसूल जूनमध्ये ४.६ टक्क्यांनी वाढून सुमारे १.३८ लाख कोटी रुपये झाला तर आयातीतून मिळणारा जीएसटी महसूल ११ टक्क्यांनी वाढून ४५ हजार कोटी रुपयांवर पोहोचला. जूनमधील एकूण केंद्रीय जीएसटी महसूल ३४ हजार कोटी रुपये, राज्य जीएसटी महसूल ४३ हजार कोटी रुपये आणि एकात्मिक जीएसटी महसूल ९३ लाख कोटी रुपये होता. याशिवाय अधिभारांमधून मिळणारे उत्पन्न १३००० कोटी रुपयांवर गेले आहे. मात्र आकडेवारीतली एक गोष्ट काळजी वाढवणारी आहे. देशातील ३० टक्के लोक मध्यम उत्पन्न गटातील आहेत. समाजातील तळातल्या पन्नास टक्के वर्गाला त्यांच्याइतकाच जीएसटीचा बोजा सोसावा लागत आहे. सांख्यिकी मंत्रालयाने तयार केलेल्या २०२२-२३ च्या घरगुती उपभोगखर्च अहवाचा वापर करून हे निष्कर्ष काढले गेले आहेत. खेड्यापाड्यांतील पन्नास टक्के सामान्य स्थितीतील लोकांना सरासरी ३१ टक्के जीएसटी भरावा लागत आहे. खेडे किंवा शहरांमधील मध्यमवर्गीयांइतकेच कर हे लोक भरत आहेत. वरच्या स्तरातील वीस टक्के ग्राहक शहरात ४१ टक्के आणि ग्रामीण भागात ३७ टक्के कर भरत आहेत. ग्रामीण भागातील तळाचे पाच टक्के ग्राहक महिन्याला सरासरी १३७३ रुपये खर्च करतात तर तेथील पाच टक्के श्रीमंतांचा सरासरी खर्च १० हजार ५०० रुपये आहे. शहरांमधील हा सरासरी खर्च अनुक्रमे दोन हजार रुपये आणि २०८२४ रुपये असा आहे.

'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनॅन्स अँड पॉलिसी' ही नवी दिल्लीतील एक अग्रगण्य संस्था आहे. या संस्थेतील एक प्राध्यापक सच्चिदानंद मुखर्जी यांनी केलेल्या अभ्यासानुसार जीएसटीमुळे गरिबांवर एक प्रकारे अन्याय होत आहे. पूर्वीच्या कररचनेपेक्षा जीएसटीमुळे करोत्तर उपभोगातील विषमता कमी झाली आहे. जीएसटी हा बऱ्यापैकी पुरोगामी कर आहे. उच्च उत्पन्न गटातील लोकांना कराचा खूप जादा दर द्यावा लागतो, तेव्हाच ती पद्धत पूर्णतः पुरोगामी मानली जाते. जगातील विविध देश जीएसटी किंवा व्हॅटमध्ये वेगवेगळे कर लावतात. ज्या वस्तूंवरचा कर कमी आहे किंवा ज्यांच्यावर जीएसटी नाही, अशा वस्तूंवरील ग्रामीण भागातील खर्च ४७ टक्क्यांच्या आसपास आहे. उलट, वरच्या वर्गातील या वस्तूंवरचा खर्च कमी आहे. कारण श्रीमंत लोक महागड्या वस्तू खरेदी करतात. उदाहरणार्थ, प्रक्रियायुक्त अन्नपदार्थ ते जास्त प्रमाणात विकत घेतात. त्यामुळे जीएसटी नसलेल्या वस्तूंच्या यादीला कात्री लावून, त्यावर जीएसटी लावणे योग्य ठरणार नाही. कारण त्यामुळे अगोदरच उपभोग कमी असणाऱ्या खेड्यापाड्यातील लोकांचा उपभोग्य खर्च अजूनही कमी होईल. जीएसटी कराची पुनर्रचना करण्याचे काम गेली चार वर्षे लांबणीवर पडत आले आहे. अल्प उत्पन्न गटातील लोक मोठ्या प्रमाणात खरेदी करत असलेल्या वस्तूंवरील करांचे दर कमी करावेत, अशी मागणी 'कॉन्फडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री'चे अध्यक्ष राजीव मेमानी यांनीदेखील केली आहे. सामान्यतः बड्या उद्योगपतींच्या संघटना अशा प्रकारची मागणी करत नाहीत. उद्या ग्राहकांची मागणीच कमी झाली, तर आपला माल कसा खपेल ही उद्योगपतींची काळजी आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे.




देशातील जीएसटी प्रणालीमध्ये नोंदणीकृत असलेल्या करदात्यांपैकी २० टक्के महिला करदाते आहेत. नोंदणीकृत कर्जाच्या आस्थापनांमध्ये १४ टक्के आस्थापना महिला सदस्यांद्वारे संचलित आहेत. भारतीय स्टेट बँकेच्या ताज्या अहवालातच ही मौलिक माहिती देण्यात आली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत महिलांचा वाढता सहभाग असून त्यामुळे महिला करदात्यांची संख्या वाढत चालली आहे. दर पाचापैकी एक नोंदणीकृत करदाता ही महिला आहे. करदात्यांच्या एकूण उत्पन्नात महिला करदात्यांच्या उत्पन्नाचा १५ टक्के हिस्सा आहे. एकूण बँक ठेवींपैकी ४० टक्के ठेवी महिला खातेदारांच्या नावे असून महिलांचे आर्थिक स्वावलंबन आणि सक्षमीकरणातील ही एक लक्षणीय प्रगती म्हणावी लागेल. जीएसटी करप्रणालीचा विचार करताना, केंद्र सरकारने महिलांच्या आर्थिक विकासाचेही भान ठेवले पाहिजे. परंतु लवकरात लवकर जीएसटीची फेररचना केली पाहिजे. ती करताना आर्थिक विषमता कमी करणारे धोरण असले पाहिजे.

सध्या करदात्यांना किरकोळ आणि खऱ्या चुकांसाठीही खटल्यांच्या चक्रातून जावे लागते, कारण कोणताही सुधारणा पर्याय उपलब्ध नाही. यामुळे वेळ आणि संसाधने या दोन्हींचा अनावश्यक अपव्यय होतो. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अनुपालन प्रणाली सुलभ करणे. सध्याच्या रिटर्न प्रणालीमध्ये जास्त फॉर्म आणि जटील कर दर आहेत. ते लहान व्यापाऱ्यांसाठी ओझे आहेत. जीएसटीचे खरे उद्दिष्ट एक सोपी आणि सुलभ कर प्रणाली साध्य करण्यासाठी फॉर्मची संख्या कमी करणे आणि दर तर्कसंगत करणे आवश्यक आहे. तिसरी प्रमुख आवश्यकता म्हणजे दीर्घकाळ प्रतीक्षित जीएसटी अपीलीय न्यायाधिकरण पूर्णपणे कार्यान्वित करणे. याशिवाय, सर्व लहान आणि मोठ्या करदात्यांना दुसऱ्या अपीलासाठी उच्च न्यायालयात जावे लागते. त्यामुळे न्यायाची प्रक्रिया मंद, महाग आणि विसंगत होते. जीएसटी विवादांचे जलद आणि स्वस्त निराकरण करण्यासाठी न्यायाधिकरणाचे मजबूत कार्य आवश्यक आहे. स्वेच्छेने नियमांचे पालन करण्यास प्रोत्साहन देणे हीदेखील काळाची गरज आहे. यासाठी वेळोवेळी कर्जमाफी किंवा तोडगा योजना सुरू केल्या पाहिजेत. त्यात करदात्यांना कठोर दंड किंवा खटल्याशिवाय जुने वाद सोडवता येतील. यामुळे महसूल वाढेल तसेच कर प्रणालीवरील विश्वास वाढेल. भारताच्या स्वातंत्र्यानंतर जीएसटी ही निश्चितच सर्वात महत्त्वाची कर सुधारणांपैकी एक आहे. यामुळे अवघ्या काही वर्षांमध्ये केवळ महसूल संकलन वाढले नाही, तर असंघटित अर्थव्यवस्थेला आळा बसला आहे आणि डिजिटलायझेशन आणि एकसमान कर प्रणालीद्वारे पारदर्शकता आली आहे. मासिक दोन लाख कोटींहून अधिक जीएसटी संकलन आणि कर पायाचा विस्तार त्याच्या यशस्वी अंमलबजावणीचे प्रतिबिंब आहे.

ई-इनव्हॉइसिंग, ई-वे बिल्स आणि सिस्टीम-चालित अनुपालनामुळे संपूर्ण करप्रणाली डेटासमृद्ध आणि जबाबदार बनली आहे. तरीही हा प्रवास पूर्ण होण्यापासून खूप दूर आहे. वर्गीकरण विवाद आणि किंमतींमध्ये अनिश्चितता निर्माण करणारी करदरांची विविधता हे अजूनही एक मोठे आव्हान आहे. लहान आणि मध्यम करदात्यांसाठी सध्याची अनुपालन चौकट तांत्रिक असली तरी अवघड आणि गुंतागुंतीची आहे. करांचे दुप्पटीकरण दूर करण्यासाठी बनवलेली इनपुट टॅक्स क्रेडिट (आयटीसी) प्रणाली आता गोंधळ, अटी आणि खटल्यांनी ग्रस्त आहे. ती प्रामाणिक करदात्यांनाही त्रास देत आहे. जीएसटीचे खरे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आता प्रक्रिया सोपी करणे, दर तर्कसंगत करणे तसेच करदाते आणि प्रशासन यांच्यातील विश्वास पुनर्संचयित करणे आवश्यक आहे. योग्य दृष्टिकोन आणि समर्पणाने अंमलात आणल्यास जीएसटी कर निश्चितच चांगला आणि साधा असण्यापलीकडे जाऊन स्थिर, पारदर्शक आणि विश्वासार्ह कर प्रणाली ठरू शकतो.

✦✦✦

# का वाढताहेत विद्यार्थ्यांच्या आत्महत्त्या?

**मुलांनी शिकून मोठे व्हावे, आपल्या पायावर उभे रहावे, आपण आयुष्यात खाल्लेल्या खस्ता मुलांच्या वाट्याला येऊ नयेत आणि मुलांनी आपल्या म्हातारपणाचा आधार व्हावे, असे प्रत्येक आईवडीलांना वाटते; परंतु या अपेक्षांच्या ओझ्याखाली आणि शैक्षणिक जगतातील वाढत्या स्पर्धेला तोंड देताना अनेक मुले आत्महत्यांचा मार्ग चोखाळत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने त्यावर व्यक्त केलेली चिंता रास्त आहे.**

नोंद
**भास्कर खंडागळे**

विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या वाढत्या घटनांवर सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच चिंता व्यक्त केली आणि हे व्यवस्थेचे अपयश असल्याचे म्हटले. न्यायालयाने म्हटले की या घटनांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरो (एनसीआरबी)च्या अहवालातील वाढती आकडेवारी चिंताजनक आहे. अहवालानुसार, २०२२ मध्ये देशभरात एकूण एक लाख ७० हजार ९२४ लोकांनी आत्महत्या केल्या, त्यापैकी १३ हजार ४४ विद्यार्थी होते. २००१ मध्ये पाच हजार ४२५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. 'एनसीआरबी'च्या अहवालानुसार अशा शंभर आत्महत्यांमध्ये आठ विद्यार्थ्यांचा समावेश होता. त्यापैकी २,२४८ विद्यार्थ्यांनी परीक्षेत नापास झाल्यामुळे जीवनत्याग केला. अभ्यासाचे ओझे, समाजाचे टोमणे, मानसिक ताण आणि शाळा-महाविद्यालयाची उदासीनता यासारख्या कारणांमुळे लहान मुले आपले जीवन संपवतात, तेव्हा हे स्पष्ट होते की आपली संपूर्ण व्यवस्था अपयशी ठरत आहे. 'एनईईटी'ची तयारी करणाऱ्या १७ वर्षांच्या विद्यार्थिनीच्या मृत्यूच्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने चिकित्सा केली. ही विद्यार्थिनी विशाखापट्टणममध्ये शिकत होती. तिच्या मृत्यूची 'सीबीआय'कडून चौकशी करण्याची मागणी आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने फेटाळून लावली होती. त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. सुनावणीदरम्यान न्यायालयाने संपूर्ण देशासाठी १५ महत्त्वाची मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. विद्यार्थ्यांची मानसिक स्थिती सुधारणे आणि आत्महत्येच्या घटना रोखणे हा त्यामागील उद्देश आहे. यासोबतच, न्यायालयाने केंद्राला ९० दिवसांच्या आत एक प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले आहे. त्यात विद्यार्थ्यांच्या मानसिक समस्यांवर काम करणाऱ्या राष्ट्रीय कार्यदलाचा अहवाल आणि सूचना कधीपर्यंत पूर्ण होतील हे सांगण्यास बजावले आहे.



या वर्षी मार्चमध्ये सर्वोच्च न्यायालयाने मानसिक आरोग्य समस्या आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटना रोखण्यासाठी 'राष्ट्रीय कार्यदल' (एनटीएफ) तयार करण्याचे आदेश दिले होते. न्यायालयाने म्हटले होते की विद्यापीठांनी केवळ शिक्षण केंद्रे बनू नयेत, तर विद्यार्थ्यांच्या कल्याण आणि विकासासाठी जबाबदार असलेल्या संस्थांची भूमिकादेखील बजावावी. महाविद्यालयांमध्ये अजूनही जातीय भेदभाव आहे. त्यामुळे वंचित समुदायांच्या विद्यार्थ्यांमध्ये एकाकीपणाची भावना वाढत आहे. महाविद्यालयीन परिसरांमध्ये जातीवर आधारित भेदभाव हा संविधानाच्या कलम १५ चे स्पष्ट उल्लंघन आहे. विद्यार्थी आपल्या घरापासून दूर असलेल्या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेतात, तेव्हा विद्यापीठे आणि महाविद्यालयांना पालकांची भूमिका बजावण्याची आवश्यकता असते. महाविद्यालयांनी केवळ नियमांची अंमलबजावणी करणे अपेक्षित नाही, तर संकटकाळात विद्यार्थ्यांना भावनिक आधारही देणे आवश्यक आहे. भारतात आत्महत्या रोखण्यासाठी काही कायदे केले गेले आहेत. त्यानुसार मानसिक आरोग्यसेवा कायदा, २०१७ नुसार मानसिक विकारांनी ग्रस्त असलेल्या व्यक्तीला त्यावर उपचार घेण्याचा आणि सन्मानाने जगण्याचा पूर्ण अधिकार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व शैक्षणिक संस्थांना रॅगिंगची तक्रार आल्यास पोलिसांकडे फिर्याद दाखल करावी लागेल.

२००९ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने म्हणजेच यूजीसीने उच्च शिक्षण संस्थांमध्ये रॅगिंगच्या घटना रोखण्यासाठी नियम जारी केले होते. विद्यार्थ्यांच्या चिंता, ताणतणाव, घराची आठवण, अपयशाची भीती यासारख्या समस्या सोडवण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने २०१६ मध्ये विद्यापीठांना विद्यार्थी समुपदेशन प्रणाली स्थापित करण्यास सांगितले होते. राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सामाजिक-भावनिक शिक्षणावर आणि शालेय प्रणालीमध्ये समुदायाच्या सहभागावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. तसेच, शाळांमध्ये सामाजिक कार्यकर्ते आणि समुपदेशक असले पाहिजेत असे म्हटले आहे. कॉलेजजीवन हा एक महत्त्वाचा बदलाचा काळ आहे. बऱ्याच विद्यार्थ्यांना पहिल्यांदाच घरापासून दूर राहत असताना कुटुंब आणि मित्रांकडून कमी पाठिंबा मिळतो. वाढत्या स्वातंत्र्य आणि स्वायत्ततेसोबतच विद्यार्थ्यांना विविध ताणतणावांना तोंड द्यावे लागते. वाढत्या शैक्षणिक गरजा, नवीन वातावरणाशी जुळवून घेणे आणि नवीन आधार प्रणाली विकसित करणे आदी समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागते. कॉलेजच्या काळात मद्य आणि व्यसनांचे मुलांना आकर्षण असते. बरेच विद्यार्थी मानसिक आरोग्य समस्या किंवा उपचारांचा पूर्वीचा इतिहास घेऊन महाविद्यालयात येतात. पर्यावरणीय ताणतणाव आणि मानसिक आरोग्य समस्या अनुभवण्याची प्रवृत्ती आत्महत्येचा धोका वाढवू शकते. अलिकडच्या राष्ट्रीय सर्वेक्षणात, १६ टक्के महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी नैराश्याच्या विकाराने ग्रस्त असल्याचे नोंदवले आहे.

आत्महत्या करणाऱ्या ९० टक्क्यांपेक्षा जास्त लोकांना निदान करण्यायोग्य मानसिक विकार असतो. महाविद्यालयीन वयातील तरुण-तरुणींपेक्षा चार ते सहापट जास्त आत्महत्या करतात. मुली पुरुषांपेक्षा प्राणघातक नसलेल्या मार्गांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता दोन ते तीनपट जास्त असते. आयुष्यात काही तरी बनण्याचे स्वप्न, अभ्यासाचे ओझे आणि इच्छेनुसार करिअर न केल्यास आत्महत्येकडे वळण्याचे प्रमाण जास्त असते. शैक्षणिक आशा आणि अनियंत्रित भावनिक आघातात अडकलेली पिढी आत्महत्येच्या मार्गावर जात असते. विद्यार्थ्यांच्या आत्महत्या दरवर्षी सुमारे चार टक्के दराने सातत्याने वाढल्या आहेत. २०२२ मध्ये सुमारे एक तृतीयांश विद्यार्थी आत्महत्या या तीन राज्यांमध्ये झाल्या होत्या. त्यात महाराष्ट्र (१,७६४ प्रकरणे), तामिळनाडू (१,४१६) आणि मध्य प्रदेश (१,३४०) अशी आकडेवारी समोर आली असून दक्षिणेकडील राज्यांमध्ये (आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, तेलंगणा आणि केंद्रशासित प्रदेश) एकूण प्रकरणांपैकी २९ टक्के घडली. त्याच वेळी, मुलींच्या आत्महत्यांमध्ये सात टक्क्यांनी वाढ झाली. देशात २०२२ मध्ये आत्महत्या करणाऱ्यांमध्ये बरेच (५३ टक्के) विद्यार्थी होते; परंतु गेल्या काही वर्षांमध्ये आत्महत्या करणाऱ्यांमध्ये लिंगभेद दिसून येतो. परीक्षा-केंद्रित स्पर्धा आणि शैक्षणिक ताण हे महत्वाचे धोके बनू लागले आहेत.

'एनसीआरबी'च्या आकडेवारीनुसार, २०२२ मध्ये अल्पवयीन मुलांच्या १,१२३ आत्महत्या स्पष्टपणे परीक्षेतील अपयशाशी जोडल्या गेल्या होत्या. त्यात महाराष्ट्र अव्वल स्थानावर आहे (३७८ प्रकरणे). त्यानंतर मध्य प्रदेश आणि झारखंडचा क्रमांक लागतो. 'आयआयटी' आणि केंद्रीय विद्यापीठांसारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्येही आत्महत्येच्या घटना वाढतच आहेत. २०१९ ते २०२३ दरम्यान एकट्या 'आयआयटी'मध्ये ९८ मृत्यूंची नोंद झाली. याच काळात केंद्रीय विद्यापीठांमध्ये रॅगिंगमुळे १२२ मृत्यू झाले. या संकटाच्या पार्श्वभूमीवर, सर्वोच्च न्यायालयाने माजी न्यायाधीश एस. रवींद्र भट यांच्या नेतृत्वाखाली एक राष्ट्रीय कार्यदल स्थापन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचे रक्षण करण्यासाठी सुधारणांची शिफारस ते करते. राष्ट्रीय आत्महत्या प्रतिबंधक धोरणात २०३० पर्यंत आत्महत्या मृत्युदर दहा टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. शैक्षणिक लक्ष स्पर्धेपासून विद्यार्थ्यांच्या कल्याणाकडे वळले पाहिजे. संस्थांना अभ्यासक्रमात एकत्रित केलेल्या मजबूत करिअर आणि समुपदेशन प्रणालींची आवश्यकता आहे. विद्यार्थी आत्महत्येची आकडेवारी विचारात घेतल्यास यात महाराष्ट्र अव्वल असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पुरोगामी महाराष्ट्रासाठी हा कलंक असून, निकोप शिक्षणपद्धती विकसित करण्याकामी आपण कमी पडल्याचे दिसून येत आहे.

आजकाल सर्वच पालक आपला पाल्य आघाडीवर रहावा, यासाठी सातत्याने दडपण टाकताना दिसून येत आहे. त्यामुळे विद्यार्थी आपल्या पालकांच्या आशा-अपेक्षा पूर्ण करण्यात कमी पडल्यानंतर खोट्या प्रतिष्ठेपायी आत्महत्येकडे वळताना दिसून येत आहेत. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या अहवालातील आकडेवारीनुसार विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांमध्ये वाढ झाल्यावरून चिंता व्यक्त करण्यात आली आहे. या आत्महत्या शेतकरी आत्महत्येच्या संख्येपेक्षा अधिक असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे देशभरात विद्यार्थ्यांवर असलेले दडपण यातून स्पष्ट दिसून येते. त्यामुळे आपल्याला शिक्षणपद्धती बदलण्याची खरी गरज आहे. हसत खेळत आणि साध्या-सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना समजेल अशा भाषेत शिक्षण देणे गरजेचे आहे; मात्र त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

✦✦✦

महासागर
साहित्य मैफल
५
रविवार ■ दि. १० ऑगस्ट २०२५

# ट्रम्प टॅरिफ आणि भारत 'झुकेगा नही'!






६ ऑगस्ट रोजी डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५०% टॅरिफ लादण्याची घोषणा केली. दुसऱ्याच दिवशी अमेरिकेचे नाव न घेता पंतप्रधान मोदींनी स्पष्ट उत्तर दिले, 'भारत हा आपला स्वतःचा देश आहे. शेतकऱ्यांच्या हिताशी कधीही तडजोड करत नाही. मला माहिती आहे की मला वैयक्तिकरीत्या मोठी किंमत मोजावी लागेल, पण मी त्यासाठी तयार आहे. एकमेकांना 'मित्र' म्हणणारे भारत आणि अमेरिका आता व्यापारावरून एकमेकांशी भांडत आहेत. ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉरला तोंड देण्यासाठी भारताकडे कोणते पर्याय आहेत? भारत अमेरिकेवरदेखील टॅरिफ लादेल का? अनेक प्रश्न निर्माण झाले असून, भारतातील उद्योजक, व्यापारी, ग्राहक आणि सामान्य नागरिक संभ्रमात आहेत.

-----------

३० जुलै रोजी ट्रम्प यांनी भारतावर २५% कर लादण्याची घोषणा केली होती, जी ७ ऑगस्टपासून लागू झाली. यापूर्वी ६ ऑगस्ट रोजी ट्रम्प यांनी भारतावर अतिरिक्त २५% कर लादण्याची घोषणा केली होती, जी २१ ऑगस्टपासून लागू होईल. ट्रम्प यांनी स्वाक्षरी केलेल्या कार्यकारी आदेशात त्यांनी म्हटले आहे की, 'भारत रशियाकडून तेल आयात करत आहे. अशा परिस्थितीत अमेरिकेत प्रवेश करणाऱ्या भारतीय वस्तूंवर २५% अतिरिक्त कर लागू केला जाईल. म्हणजेच आता भारतावर एकूण ५०% टॅरिफ लादण्यात आला आहे.

ट्रम्प म्हणाले की अजूनही बरेच काही करायचे आहे. अनेक सेकंडरी सँक्शन्स अर्थात दुय्यम निर्बंध येणार आहेत. दुय्यम निर्बंध म्हणजे असे निर्बंध जे थेट एखाद्या देशाला लागू होत नाहीत, तर तिसऱ्या देशाला लागू होतात. ते व्यवसाय करण्यावर लादले जातात. याचा अर्थ अमेरिका रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या भारतीय कंपन्यांवर कारवाई करेल. अमेरिकेत येणाऱ्या भारतीय वस्तूंवर २५% अतिरिक्त कर लावण्यात येईल, असे डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले.

भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने ट्रम्प यांच्या निर्णयाला चुकीचे सांगत म्हटले की, 'आम्ही बाजारातील परिस्थितीनुसार कारवाई करू. आम्ही तेल खरेदी करतो आणि त्याचा उद्देश १४० कोटी भारतीयांची ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करणे आहे. इतर अनेक देशही असेच करत असताना अमेरिका भारतावर अतिरिक्त शुल्क लादत आहे हे अत्यंत दुर्दैवी आहे. हे उपाय अन्याय्य, बेकायदेशीर आणि चुकीचे आहेत. भारत आपल्या राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलेल.'

७ ऑगस्ट रोजी पंतप्रधान मोदी म्हणाले होते की, 'आमच्यासाठी, आमच्या शेतकऱ्यांचे हित प्रथम येते. भारत आमच्या शेतकरी, पशुपालक आणि मच्छीमार बंधू-भगिनींच्या हिताशी कधीही तडजोड करणार नाही.' याचा अर्थ आता ट्रम्प यांच्या अटी मान्य करण्याऐवजी भारत त्यांच्या प्रतिवादाच्या रणनीतीवर काम करेल.

तज्ज्ञांच्या मते, ट्रम्पच्या ५०% टॅरिफ लादण्याच्या निर्णयाला उत्तर देण्यासाठी भारताकडे ४ मार्ग आहेत.

**१: अमेरिकेवरील व्यापार आणि अवलंबित्व कमी करणे**

अर्थशास्त्र तज्ज्ञ आणि निवृत्त जेएनयू प्राध्यापक अरुण कुमार यांच्या मते, भारत अमेरिकेपेक्षा पुढे आहे. अवलंबित्व कमी करून ५०% शुल्क टाळता येते. यामुळे भारताला जितका फायदा होईल त्यापेक्षा अमेरिकेला जास्त नुकसान होईल.

स्वित्झलंडमधील इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर मॅनेजमेंट डेव्हलपमेंट येथील भूराजनीतीचे प्राध्यापक सायमन यांच्या मते, 'भारत त्याच्या केवळ एक षष्ठांश वस्तू अमेरिकेला निर्यात करतो. त्यापैकी स्मार्टफोन सर्वात लोकप्रिय आहेत, हिरे दुसऱ्या क्रमांकावर आहेत, नंतर औषधे आणि शेवटी तेल. या वस्तू विकण्यासाठी भारताकडे अमेरिकेव्यतिरिक्त इतर अनेक देशांच्या बाजारपेठेत पर्याय आहेत.'

खरं तर, भारत अमेरिकेव्यतिरिक्त इतर अनेक देशांना वस्तू निर्यात करतो...

**युरोपियन युनियन :** २०२४ मध्ये ६४.७ लाख कोटी रुपयांच्या कपडे, औषधे आणि मौल्यवान रत्ने यांसारख्या वस्तूंची निर्यात झाली.

**आसियान देशः** २०२४ मध्ये भारताने ब्रुनेई, कंबोडिया, इंडोनेशिया, मलेशिया, थायलंड आणि व्हिएतनामसारख्या आसियान देशांना ३४.९ लाख कोटी रुपयांची इलेक्ट्रॉनिक्स, औषधे आणि तांदूळ यासारखी कृषी उत्पादने विकली.

**आफ्रिकाः** भारताने २०२४ मध्ये २६.२ लाख कोटी रुपयांच्या वस्तूंची निर्यात केली, ज्यामध्ये सर्वाधिक औषधे, ऑटोमोबाईल्स आणि अन्न उत्पादनांचा समावेश आहे.

मध्य पूर्वेतील देशः भारत यूएईला २४.५ लाख कोटी रुपयांच्या आणि सौदी अरेबियाला १०.५ लाख कोटी रुपयांच्या वस्तू निर्यात करतो.

अरुण कुमार म्हणतात, 'अमेरिकेव्यतिरिक्त भारताकडे असलेल्या पर्याया बाजारपेठांबद्दल, अमेरिकेचे हे देश पण जास्त वर्चस्व गाजवतात. कोणताही देश अमेरिकेसारख्या शक्तिशाली देशाशी शत्रुत्व ठेवू इच्छित नाही. अमेरिका अनेक देशांना शस्त्रास्त्रे आणि आर्थिक मदत पुरवते. तथापि, जर या देशांनी भारतासोबत व्यापार वाढवला तर ट्रम्प या देशांवरही टॅरिफ वाढवतील.

ट्रम्प यांनी चीन, ब्राझील, कॅनडा आणि दक्षिण आफ्रिका यासह अनेक देशांवर टॅरिफ लादले आहेत. या परिस्थितीत, देश स्वतःच अडचणीत आहे, म्हणून ते भारतातून आयात वाढवण्याचा धोका पत्करण्याचे टाळतील.

**२: अमेरिके ऐवजी रशिया आणि चीनशी संबंध सुधारणार**

परराष्ट्र व्यवहार तज्ज्ञ आणि जेएनयूचे प्राध्यापक डॉ. राजन कुमार म्हणतात, 'हा फक्त भारत आणि अमेरिका यांच्यातील टॅरिफ आणि व्यापाराचा मुद्दा नाही. ट्रम्प राजकीय कारणांसाठीही भारतावर दबाव आणत आहेत.

त्यांना वाटते की भारताने रशियाऐवजी अमेरिकेकडून शस्त्रे आणि तेल खरेदी करावे, परंतु भारत कधीही तयार नाही. अशा परिस्थितीत, भारत रशिया आणि चीनसह व्यापारासाठी एक यंत्रणा तयार करण्याचा प्रयत्न करू शकतो.'

भारताने हे स्पष्ट केले आहे की ते आपल्या राष्ट्रीय हितासाठी आणि आर्थिक सुरक्षेसाठी आवश्यक असलेली सर्व पावले उचलेल. घेईल.

पंतप्रधान मोदी ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर रोजी एससीओ शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी चीनला जातील. त्यापूर्वी ते ३० ऑगस्ट रोजी जपानमध्ये होणाऱ्या भारत-जपान शिखर परिषदेत सहभागी होतील.

७ ऑगस्ट रोजी भारतीय राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल हेही रशियाला पोहोचले. रशियाचे संरक्षण मंत्री सर्गेई शोइगु यांच्याशी भेट घेतल्यानंतर डोभाल म्हणाले, 'आमचे खूप चांगले संबंध बनले आहेत, ज्याची आम्ही प्रशंसा करतो. आमच्या देशांमध्ये एक मजबूत भागीदारी आहे आणि आम्ही उच्च पातळीवर संवाद साधतो.'

रशियन वृत्तसंस्थेनुसार, रशियाचे अध्यक्ष पुतिन भारताला भेट देऊ शकतात. ट्रम्प यांनी रशियासोबतच्या भारताच्या संबंधांवर केलेल्या टिप्पण्यांमुळे ही भेट खूप महत्त्वाची मानली जाते.

प्राध्यापक सायमन जे. इव्हनेट यांच्या मते, जपान आणि ब्रिटनसारखे देश त्यांच्या स्वतःच्या संरक्षण गरजा पूर्ण करत आहेत. यासाठी ते अमेरिकेवर अवलंबून आहेत. म्हणून या देशांनी अमेरिकेच्या टॅरिफ लादण्याच्या अटी स्वीकारल्या. तर भारत, चीन, रशिया, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिकेसारखे ब्रिक्स देश अमेरिकेवर अवलंबून नाहीत. म्हणून, त्यांना अमेरिकेच्या अटी स्वीकारण्याची सक्ती नाही.

आर्थिक तज्ज्ञ शरद कोहली म्हणतात, 'ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉरमध्ये ब्रिक्स देश एकत्र येत आहेत, ज्यामुळे ट्रम्प यांना थेट संदेश जाईल की भारत रशिया आणि चीनसारख्या अमेरिकेच्या शत्रू देशांशी व्यवहार करणार नाही. मित्रदेखील जोडले जातील, ज्यामुळे अमेरिकेविरुद्ध एक मोठी लष्करी शक्ती निर्माण होईल.'

तथापि, राजन कुमार म्हणतात, 'अलीकडेच ब्रिक्स देश त्यांच्या पातळीवर अमेरिकेशी बोलत आहेत. हे देश अमेरिकेवर दबाव आणून संदेश देण्याचा प्रयत्न करत आहेत, परंतु त्यांच्यातही मतभेद आहेत. जर चीन आणि अमेरिकेत करार झाला तर ट्रम्प यांनी भारतावर कितीही कर लावतात तरी त्यांना काही फरक पडणार नाही.'

**३: देशांतर्गत वापर वाढवणे**

भारत १४० कोटी रुपयांच्या देशांतर्गत बाजारपेठेचा वापर करून ट्रम्पच्या शुल्कापासून वाचू शकतो. अमेरिकेत शुल्क आकारले जाणारे उत्पादन भारतात उत्पादित करण्यासाठी निर्यातीवरील अवलंबित्व कमी करता येते.

भारतीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल म्हणाले, '१४० कोटी रुपयांची आमची बाजारपेठ ही आमची ताकद आहे. आम्ही स्वावलंबी भारत अंतर्गत देशांतर्गत वापर वाढवू.' फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीने असेही म्हटले आहे की, 'भारतातील मध्यमवर्गीय लोक आणि ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म ट्रम्प यांचे टॅरिफ घटवू शकतात.

नीती आयोगाच्या २०२४ च्या अहवालात असे म्हटले आहे की २०३० पर्यंत भारतातील मध्यमवर्गीय लोकसंख्या ६०% पर्यंत पोहोचेल. त्यामुळे घरगुती वापर वाढेल. २०२४ मध्ये भारताचा जीडीपी \$३.५७ ट्रिलियन होता. यापैकी ६०% देशांतर्गत वापरातून येतो. याचा अर्थ भारताच्या एकूण जीडीपीचा मोठा भाग भारतातील लोकांच्या खरेदीतून येतो.

नीती आयोगाच्या अहवालानुसार, मध्यमवर्गीय सुमारे ५० कोटी लोकांची क्रयशक्ती वाढत आहे आणि २०३० पर्यंत ती २५० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचू शकते. २०२४ मध्ये भारतीय इलेक्ट्रॉनिक्स बाजारपेठ १५५ अब्ज डॉलर्सची होईल, ज्यामध्ये स्मार्टफोन आणि लॅपटॉपची मागणी झपाट्याने वाढेल. याशिवाय, भारताची देशांतर्गत औषध बाजारपेठ सुमारे ६५ अब्ज डॉलर्सची आहे.

तथापि, अरुण कुमार यांच्या मते, 'निर्यातीऐवजी देशांतर्गत वापरावर अवलंबून राहणे तितके सोपे नाही. ते ऐकण्यासारखे आणि म्हणण्यासारखे वाटते. भारत आपले संपूर्ण उत्पादन देशांतर्गत बाजारात विकू शकत नाही कारण लोकांचे उत्पन्न खूप कमी आहे. जेव्हा लोकांकडे पैसे नसतात तेव्हा ते बाजारात खरेदी करत नाहीत.'

'सध्या भारतात दरडोई वार्षिक उत्पन्न फक्त २.५ लाख रुपये आहे. देशात महागाईही वेगाने वाढत आहे. लोकांकडे २.५ लाख रुपयांचीही कमतरता आहे. आता बाजारात वस्तू वाढल्या तर समस्याही वाढतील. म्हणून, सरकारला प्रथम दरडोई उत्पन्न वाढवावे लागेल, त्यानंतरच निर्यात केलेला माल घरगुती होईल.

**४: भारताकडे अमेरिकेला विरोध करण्याचाही एक मार्ग आहे**

भारत सरकार अमेरिकन वस्तूंवर रेसिप्रोकल टॅरिफ वाढवू शकते. अमेरिकन टॅरिफ धोकादायक आहेत, परंतु जर भारताने टॅरिफ वाढवले तर मायक्रोसॉफ्ट, गुगल आणि अमेझॉनसारख्या अमेरिकन कंपन्यांना मोठे नुकसान होईल.'

तज्ज्ञांच्या मते 'ट्रम्पविरुद्ध प्रत्युत्तराची रणनीती काम करते. जेव्हा चीनने ट्रम्प यांच्या टॅरिफला प्रत्युत्तर म्हणून टॅरिफ लादण्याची चर्चा केली तेव्हा ट्रम्प यांनी माघार घेतली आणि चीनने पण टॅरिफ तीन महिन्यांसाठी पुढे ढकलला.' आता भारतानेही तयारी केली असून, झुकेगा नही... अशी कणखर भूमिका घेतली आहे.

■ ■ ■

## बेचिराख



१९३९ ते १९४५ दरम्यान, झालेले दुसरे महायुद्ध हे मानवी इतिहासातील सर्वात क्रूर युद्ध म्हणून ओळखले जाते.

या युद्धादरम्यान विविध देशांचे कोट्यवधी सैनिक आणि तेवढेच नागरिक मारले गेले होते. या युद्धाच्या अखेरीस शरणागती पत्करण्यास तयार नसलेल्या जपानला अद्दल घडवण्यासाठी अमेरिकेने अणुबॉम्बचा वापर केला होता. जपानमधील हिरोशिमावर ६ ऑगस्ट आणि ९ ऑगस्ट १९४५ रोजी नागासाकी या शहरांवर अणुबॉम्ब टाकण्यात आले. या हल्ल्यांमध्ये सुमारे दीड ते दोन लाख जपानी नागरिक मारले गेले होते.

१९४५ च्या मध्यावर युद्ध निर्णायक स्थितीत आले असतानाही. अमेरिका, इंग्लंड, चीन या मित्र राष्ट्रांच्या सैन्याला अक्ष राष्ट्रांमधील जपानकडून कडवी झुंज मिळत होती. हिटलरचा जर्मनी आणि मुसोलिनीच्या इटलीने शरणागती पत्करल्यानंतरही जपान शस्त्र खाली ठेवण्यास तयार नव्हता.

सहा वर्षे चाललेले युद्ध लांबत असल्याने मित्र राष्ट्रांच्या सैनिकांचीही दमछाक होत होती.

अशा परिस्थितीत अमेरिकेने जपानवर एका नव्या आणि तितक्याच संहारक अस्त्राचा वापर करण्याचा निर्णय घेतला. हे संहारक अस्त्र होते अणुबॉम्ब.

क्षणात महाविद्ध्वंस घडवणारा अणुबॉम्ब टाकण्यासाठी ठिकाण निश्चित करण्यात आल्यानंतर अमेरिकन जवानांनी हा नव्या प्रकारचा बॉम्ब टाकायचा याचा सराव केला. त्यानंतर ६ ऑगस्ट १९४५ रोजी हिरोशिमावर बॉम्ब टाकण्याचे निश्चित करण्यात आले.

त्याआधी असा बॉम्ब टाकणार असल्याची पत्रके हिरोशिमा शहरात टाकली होती. ६ ऑगस्टच्या सकाळी अमेरिकन हवाई दलाचे इनोला गे हे विमान अणुबॉम्ब घेऊन निघाले. त्यावेळी हिरोशिमामधील नागरिकांना आपल्यासमोर कोणते संकट येतेय याची काहीच कल्पना नव्हती. हिरोशिमामधील स्थानिक वेळेनुसार सकाळी सव्वा आठ वाजता लिटल बॉय नावाचा सुमारे ४४०० किलो वजनाचा अणुबॉम्ब शहरावर टाकण्यात आला. तेथील रहिवाशांनी एक विचित्र आकाराचा सूर्य चमकताना पाहिले. अन् क्षणात त्याचा स्फोट होऊन प्रचंड उष्णता आणि वादळ निर्माण झाले. हा बॉम्ब जिथे पडला तिथल्या हजारो लोकांची राखही शिल्लक राहिली नाही. तर उर्वरित शहरात लाखभर लोक मारले गेले. जे जखमी झाले त्यांची अवस्था वेदनादायी जखमांमुळे मेल्याहून मेल्यासारखी झाली.

त्यानंतर तीन दिवसांनी नागासाकी या जपानमधील औद्योगिक शहराला अमेरिकेने लक्ष्य केले. या शहरावर लिटल बॉयपेक्षा मोठा बॉम्ब टाकण्यात आला. मात्र नागासाकी हे शहर डोंगरांनी वेढलेले असल्याने मर्यादित परिसरात प्रचंड हानी झाली. येथेही सुमारे ६० ते ८० हजार लोक मारले गेले. दोन्ही शहरे बेचिराख झाली. या दोन्ही हल्ल्यात वापरण्यात आलेल्या बॉम्बची नावे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्ट यांच्या नावावरून लिटल बॉय आणि इंग्लंडचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांच्यावरून फॅट मॅन असे करण्यात आले होते. या हल्ल्यामुळे मनोबल खचलेल्या जपानने अखेर १५ ऑगस्ट १९४५ रोजी शरणागती पत्करली आणि दुसऱ्या महायुद्धाची समाप्ती झाली.

■ ■ ■

# राष्ट्रीय ध्वजारोहण व ध्वज फडकविणे यातील फरक समजून घ्यावा..



डॉ. अविनाश प. परांजपे
वानाडोंगरी, हिंगणारोड, नागपूर.

आज आपले लक्ष, आपला राष्ट्रीय ध्वजारोहण व ध्वजफडकविणे यातील फरक समजुन घ्यावा ह्याकडे वेधण्याचा माझा प्रयत्न आहे.

याचे मुख्य कारण म्हणजे, आज आपल्या सारख्या देशभक्त सामान्य नागरिकाला असे दिसून येते की,ज्यामुळे आपले ह्रदय विदीर्ण होत असते. आपले काही दृकश्राव्य माध्यमांचे थेट प्रक्षेपण होत असताना त्यांचे पडद्यावरील प्रतिनिधी, काही अधिकारी, काही शासकीय , काही निमशासकीय, काही खाजगी संस्था, काही शिक्षणसंस्था, यांचे अधिकारी, आणि बरेच सामान्य नागरीक यांनाही राष्ट्रीय ध्वजारोहण व ध्वजफडकविणे यातील फरका बाबत विशेष माहिती असलेली दिसून येत नाही.

आपण हे लक्ष्यात घेतले पाहिजे की दिनांक १५ ऑगस्ट १९४७ या दिवशी स्वातंत्र्य मिळण्याच्या एक क्षण आधी पर्यन्त आपल्या देशावर ब्रिटीशांचा यूनियन जॅक हा झेंडा फडकत होता. परंतु आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्या बरोबर पुढच्या क्षणी आपण तो ब्रिटीशांचा यूनियन जॅक हा झेंडा खाली उतरविला आणि आपल्या तिरंगा ध्वजाचे आरोहण केले. म्हणजे आपला तिरंगा ध्वजदंडावर आरुढ केला.

याचा अर्थ आपला तिरंगा खांबावर चढविला. या करिता सुरवातीला आपल्या तिरंगा झेंड्याची घडी केलेली वळकटी खांबाच्या खालच्या बाजूकडुन दोरीने ओढून वर वर चढवत सर्वात उंच ठिकाणी नेऊन मग तो तिरंगा फडकविला. या संपूर्ण प्रक्रियेला ध्वजारोहण असे नाव आहे. असे ध्वजारोहण हे फक्त आणि फक्त दिनांक १५ ऑगस्ट रोजीच केले जाते.

तसेच दिनांक २६ जानेवारी १९५० रोजी आपल्या देशाने आपले संविधान लागू करून स्वतःला प्रजासत्ताक म्हणून घोषित केले. या दिवशी आपला तिरंगा सुरवाती पासूनच ध्वजदंडावर आरूढच असल्याने त्याला वर वर चढवत सर्वात उंच ठिकाणी नेण्याची आवश्यकता नव्हती. फक्त आधीच वर नेऊन ठेवलेली आपल्या तिरंगा झेंड्याची घडी केलेली वळकटी, दोरीने ओढून झेंडा फडकावायचा होता.

त्यामुळे त्या दिवशी फक्त आपला तिरंगा ध्वजफडकविणे हीच कृती करण्यात आली. तेव्हा पासून प्रत्येक २६ जानेवारी रोजी आपण केवळ तिरंगा ध्वजफडकविणे हीच कृती करत असतो, आणि तीच केली पाहिजे.

परंतु अज्ञानवश, आपणा पैकी काही मंडळी १५ ऑगस्ट रोजी तिरंगा ध्वजफडकविणे ही कृती करत असतील, किंवा तसे बोलत असतील तर ते चूक आहे.

तसेच २६ जानेवारी या दिवशी ध्वजारोहण करत असतील तर तसे करणे, किंबहुना तसा शब्दप्रयोग करणे देखील चूक आहे. गेल्या २६ जानेवारीला समाज माध्यमांवर असे बरेच व्हिडिओ व्हायरल झाले होते, की टीव्ही वरील बऱ्याच संवादादातांनी जनतेतील अधिकारी ते सामान्य मजुरांपर्यन्त वेगवेगळ्या मंडळींना विचारले की, ह्रआज काय झाले होते? त्यावर जवळ जवळ ७० टक्के लोकांना बरोबर उत्तर देता आलेले नव्हते. कोणी स्वातंत्र्य मिळाले म्हंटले होते, तर कोणी पाकिस्तान सोबत लढाई जिंकली असे उत्तर दिले होते. म्हणूनच हा लेखनाचा पंक्तीप्रपंच करीत आहे. जय हिंद!

# लोकानुनयाच्या राजकारणाने सरकारी तिजोरीलाच सुरुंग

नितीशकुमार यांनी दरमहा १२५ युनिट मोफत वीज देण्याची निवडणूकपूर्व आकर्षक घोषणा करून बिहारच्या राजकीय वतुर्ळात खळबळ उडवून दिली. २०१५ च्या दिल्ली निवडणुकीत अशाच प्रकारच्या घोषणेसाठी अरविंद केजरीवाल यांच्यावर उघडपणे टीका करणारे नितीश आता स्वतः अशा घोषणा करत आहेत. त्यावरून निवडणुकीदरम्यान लोकप्रिय घोषणांकडे नेत्यांचे आकर्षण किती वाढते हे स्पष्ट होते.

---------------------------

निवडणुका जिंकण्याच्या आंधळ्या शर्यतीत सर्व पक्ष याला बळी पडत आहेत. महिलांना आकर्षित करण्यासाठी दरमहा त्यांच्या खात्यात पैसे जमा करणे असो किंवा सरकारी नोकऱ्यांचे आश्वासन असो, नेत्यांना वाटते की सत्ता ही त्यांची वैयक्तिक कंपनी आहे!

सर्वांगीण विकास आणि आर्थिक शिस्तपणाला लावून मोफत भेटवस्तू वाटण्याच्या मर्यादा ओलांडल्या गेल्या आहेत. ही प्रवृत्ती निवडणूक व्यवस्थेला उद्ध्वस्त करत आहे आणि देशभरातील राज्यांच्या खर्चावर मोठा भार टाकत आहे. बिहारमधील निवडणुकीच्या काही महिन्यांपूर्वी नितीश यांनी घाईघाईत किती घोषणा केल्या आहेत याचा विचार करा नेत्यांनी एक गोष्ट समजून घ्यावी. निवडणुकीतील आश्वासने मते मिळवू शकतात, परंतु दीर्घकाळात ती लोकशाही राजकारणाची विश्वासार्हता कमकुवत करतात. निवडणूक ज्वर कमी झाल्यावर कठोर वास्तवाला सामोरे जावे लागते. बिहारमधील मूळ रहिवासी महिलांसाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये ३३% आरक्षण, ज्येष्ठ नागरिक आणि अपंगांसाठी सामाजिक सुरक्षा पेन्शनमध्ये तिप्पट वाढ, एक कोटी नोकऱ्या निर्माण करणे, विद्यार्थ्यांना दरमहा ४ ते ६ हजार रुपये वेतन, महिलांसाठी मोफत बस प्रवास आणि गरिबांसाठी मोफत घरे. यापैकी अनेक योजना आधीच लागू केल्या गेल्या आहेत. त्यामुळे मतदारांना त्यांचे फायदे आणि भार लगेच दिसेल.

उदाहरणार्थ- निवडणुका येईपर्यंत कुटुंबांना वीज वापरासाठी शून्य पेमेंटसह तीन बिले मिळतील. सामाजिक सुरक्षा पेन्शनमध्ये वाढ केल्याने या वर्षी राज्याच्या तिजोरीवर ९००० कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडण्याची अपेक्षा आहे. बसमध्ये मोफत प्रवासामुळे होणारा महसूल तोटा हळूहळू जाणवेल. कर्नाटकात सत्तेत दोन वर्षे पूर्ण झाल्यानंतर काँग्रेस सरकारला धक्का बसू लागला आहे. विद्यार्थ्यांच्या वेतनाचा हिशोब अद्याप झालेला नाही.

गेल्या २० वर्षांपासून बिहारच्या राजकारणावर वर्चस्व गाजवणारे नितीश यांनी सुशासन म्हणून नावलौकिक मिळवला होता. गरिबांसाठी त्यांनी अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या असल्या तरी त्यांचा दृष्टिकोन सावध होता. त्यांनी त्यांच्या योजना गरजूं पुरत्या मर्यादित ठेवल्या आणि ध्येयहीन भेटवस्तू वाटल्या नाहीत.

परंतु मध्य प्रदेश ते महाराष्ट्र आणि झारखंड अशा अलिकडच्या निवडणुकांमध्ये सत्ताधारी सरकारांच्या शानदार विजयांपासून ते अनभिज्ञ राहू शकले नाहीत. कमी उत्पन्न गटातील महिलांसाठी योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे या राज्यांमधील सत्ताधारी पक्षांना बरीच मते मिळाली. कल्याणकारी राजकारण आणि लोकप्रिय राजकारणात खूप फरक आहे. कल्याणकारी राजकारणाचा उद्देश गरिबांना आधार देणे आहे.

भारतासारख्या देशात अंदाजानुसार २०% लोकसंख्या दारिद्रयरेषेखाली राहते. सरकारनी लोकांना मदत करण्यासाठी पुढाकार घ्यावा लागेल. ते लोकांना बाजार शक्तींच्या दयेवर सोडू शकत नाहीत. परंतु दुर्दैवाने असे दिसते की राजकीय पक्षांचा जमिनीवरील वास्तवाशी संपर्क तुटला आहे. त्यांच्याकडे त्यांना खरा अभिप्राय देणारे कार्यकर्ते आणि संघटना शिल्लक नाहीत.

डिसेंबर २०२४ मध्ये आरबीआयने राज्यांच्या अर्थसंकल्पावरील अहवालात मोफत आणि सवलतींवरील खर्चात झपाट्याने वाढ होत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली. यामध्ये राज्य सरकारांना त्यांच्या अनुदान खर्चावर नियंत्रण आणि तर्कसंगत करण्याचा सल्ला देण्यात आला होता. जेणेकरून व्यापक महत्त्वाच्या अधिक महत्त्वाच्या योजनांसाठी पैशांची कमतरता भासू नये.

याच कारणामुळे आज महाराष्ट्र, कर्नाटक, झारखंड किंवा बिहार - सरकारे खर्च नियंत्रित करण्यासाठी लाभार्थ्यांची यादी कमी करण्यात व्यस्त आहेत. राज्याचा कर्जाचा भार जास्त वाढू नये, असा त्यामागील उद्देश आहे.

महाराष्ट्र सरकारने निवडणूक जिंकून देणाऱ्या लाडकी बहीण योजनेतून २६.३४ लाख लाभार्थ्यांची नावे वगळली आहेत. कारण ते अपात्र आढळून आले होते. झारखंडची मैयाँ सन्मान योजना देखील रखडत आहे आणि महिलांच्या खात्यात पैसे हस्तांतरित करण्याचे काम अधूनमधून होत आहे.

वाढत्या खर्चामुळे कर्नाटक सरकार महिलांसाठी मोफत बस प्रवासाचा विचार करत आहे. दिल्लीत तसेच घडत आहे. पगारदार वर्ग यावरून फार मोठ्या प्रमाणात नाराज असल्याचे दिसून येते.



# कला, क्रीडा यांचा समन्वय सर्वांगीण विकासासाठी आवश्यक : ना.कोकाटे

**नाशिक ।** नाशिक कलानिकेतन आणि चित्रकला महाविद्यालय यांचा राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर लौकिक आहे. या संस्थेतून घडलेले विद्यार्थी आपल्या उत्कृष्ट कलाकृतींमुळे देश-विदेशात नावलौकिक मिळवत आहेत. कला आणि क्रीडा यांचा समन्वय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहे. असे प्रतिपादन क्रीडामंत्री ना. माणिकराव कोकाटे यांनी केले.

कलामहर्षी वा. गो. कुलकर्णी यांनी १९४० साली स्थापनेची मुहूर्तमेढ रोवलेली नाशिक कलानिकेतन ही संस्था शहराच्या कलात्मक ओळखीचे अभिमानस्थान आहे. या संस्थेच्या अंतर्गत चालणाऱ्या चित्रकला महाविद्यालयास राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी



सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी त्यांनी संस्थेचा आढावा घेऊन संवाद साधला. नाशिक कलानिकेतन आणि चित्रकला महाविद्यालय यांचा राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर लौकिक आहे. या संस्थेतून घडलेले विद्यार्थी आपल्या उत्कृष्ट कलाकृतींमुळे देश-विदेशात नावलौकिक मिळवत आहेत. याविषयी त्यांनी अभिनंदन करीत समाधान व्यक्त केले. नाशिक कला निकेतन ही संस्था केवळ नाशिकची नव्हे तर राज्याची कलाधनसंपदा आहे. येथे शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याची कलात्मक प्रगती ही देशाच्या सांस्कृतिक शक्तीत भर घालणारी आहे असे ते म्हणाले. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष ॲड. अविनाश भिडे व महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. संजय साबळे यांनी पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन स्वागत केले. संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विकास गोगटे, सचिव प्रा. संध्या केळकर, सहसचिव दीपक वर्मा, कोषाध्यक्ष प्रवीण बुरकुले, तसेच प्रा. योगेश सूर्यवंशी, प्रा. विशाखा कुलकर्णी, प्रा. समाधान काकड उपस्थित होते.

# खेडभैरव परिसरात एका शेतातील वारुळात दिसली शिवपिंडीची आकृती



**नाशिक ।** श्रावण महिना म्हटला की शिवालयात शिवपिंडीचे दर्शन घेण्यासाठी शिवभक्तांची वर्दळ होते. मात्र जीवांच्या हालचालीतूनही शिवपिंडीच्या अनोख्या रूपाचे दर्शन ही दुर्मिळ बाब समजली जाते. इगतपुरी तालुक्यातील खेड भैरव परिसरात एका शेतात मुंग्यांच्या हालचालीतून वारुळाची कृतीतुन शिवपिंडीचे रूप दिसल्याने परिसरातील शेतकरी व भाविकांनी आश्चर्य व्यक्त केले.

इगतपुरी तालुक्यातील पूर्व भाग असलेल्या खेडभैरव परिसरात एका शेतकऱ्याच्या शेतात मुंग्यांचे वारुळ दिसून आले या वारुळाला शिवपिंडीची प्रतिकृती निर्माण झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

श्रावण महिन्यात मुंग्यांनीही शिवपिंडीच्या स्वरूपात वारुळाचे दर्शन दिले. शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता हजारो मुंग्यांची हालचाल या ठिकाणी दिसून आली. मुंग्यांनी आपले वारूळ निर्माण केले मात्र ते प्रत्यक्ष शिवपिंडीच्या रुपात निर्माण केल्याने श्रावण महिन्यात वारुळातून शिवपिंडीचे प्रत्यक्ष दर्शन झाल्याने शेतकरी वर्ग समाधान व्यक्त करीत आहे.

# महिरावणी येथे जागतिक आदिवासी दिवसानिमित्त शुभेच्छा



आपली परंपरा, संस्कृती आणि वारसा जपत आदिवासी बांधवांच्या प्रगतीसाठी व एकतेसाठी कार्य करण्याचा संकल्प या दिवशी करू या. चला, आपला अभिमान असलेल्या आदिवासी संस्कृतीलानवे बळ देऊ या!

# कुसूर, धामोडे, नगरसूल येथे तलाठी कार्यालयाचे उद्‌घाटन, लोकार्पण

**नाशिक ।** ग्रामस्तरावर तलाठी, मंडलाधिकारी, ग्रामपंचायत कार्यालयाच्या माध्यमातून ग्रामस्थांच्या अडचणी ग्रामस्तरावर प्राधान्याने सोडविणे आवश्यक आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लोकाभिमुख प्रशासनासाठी लोकसेवकाची भूमिका निभवावी, असे प्रतिपादन अन्न, नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. कुसूर, धामोडे येथील तलाठी कार्यालयाचे व नगरसूल ता. येवला येथील तलाठी, मंडलाधिकारी कार्यालयाच्या उदघाटन व लोकार्पण सोहळा कार्यक्रमप्रसंगी मंत्री श्री. भुजबळ बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी बाबासाहेब गाढवे, तहसीलदार आबा महाजन, धामोडेचे मंडलाधिकारी गणेश गाडेकर, गट विकास अधिकारी नम्रता जगताप सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी सुमेरसिंग पाकळ आदी उपस्थित होते.



मंत्री श्री. भुजबळ म्हणाले की, ग्रामस्तरावरील मंडलाधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, आरोग्यसेवकांची भूमिका ही लोकसेवकाची आहे. अधिकारी, कर्मचारी यांनी ग्रामस्थांच्या अडी- अडचणी सोडवून, प्रशासन अधिक गतिमान करण्यावर लक्ष केंद्रित करावे. तलाठी कार्यालयाच्या इमारतीचे सुसज्ज बांधकाम झाल्यामुळे दस्तऐवज व्यवस्थित ठेवण्यास मदत होईल. यामुळे प्रशासकीय कामकाज अधिक गतीने होईल. तसेच यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, सौर कृषी पंप योजनेच्या माध्यमातून दिवसा वीज मिळण्यास मदत झाली आहे. तसेच मांजरपाडा हा पथदर्शी प्रकल्प साकारण्यात आलेला आहे. या प्रकल्पाचे पाणी येवल्याच्या शेवटच्या टोकापर्यंत पोहचविण्यासाठी २६३ कोटी रुपये खर्च करून कालव्याचे काँक्रीटीकरण करण्यात आले आहे. या प्रकल्पाच्या अधिकच्या पाण्यासाठी पार गोदावरी प्रकल्प राबविण्यात येत आहे. याचा डीपीआर तयार करण्यात येत आहे. वर्षभरात हे काम पूर्ण होऊन कामाला सुरुवात होईल. यामाध्यमातून १० टीएमसी पाणी उपलब्ध होणार आहे. हे पाणी या कालव्याच्या माध्यमातून नाशिकसह मराठवाड्याला पोहचविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. मतदारसंघातील पाणी प्रश्नही प्राधान्याने मार्गी लावले जातील, असेही त्यांनी सांगितले. यावेळी सरपंच सुरेखा गायकवाड, कांताबाई भड, अनिता पैठणकर, उपसरपंच मंगल कमोदकर, लता गायकवाड यांच्यासह ग्रामस्थ, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**३३ लाख रुपयांचा खर्च**

कुसूर, धामोडे तलाठी कार्यालयासाठी प्रत्येकी ३३ लाख रुपये, तर नगरसूल मंडलाधिकारी कार्यालयासाठी ३७ लाख रुपयांचा खर्च आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## ➤ महत्त्वाचे

### श्रावणमासनिमित्त रुद्राभिषेक, धार्मिक विधी, सामाजिक उपक्रम

**नाशिक ।** श्री गुरुवर्य ज्योतिषाचार्य पंडित पुरुषोत्तम जोशी महाराज यांच्या सानिध्यात श्रावणमासनिमित्त रुद्राभिषेक आयोजित करण्यात आला आहे. हा अभिषेक गेल्या तीन वर्षापासून दर श्रावण महिन्यात लोक कल्याणासाठी करण्यात येत आहे. सर्व भाविकांनी तिसरा सोमवार व चौथा सोमवारी या अभिषेकाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक अतुल प्रकाश धोंगडे यांनी केले आहे. तसेच यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम व सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. या अभिषेकात तीन वर्षापासून अनेक भाविक मोठ्या संख्येने येथे उपस्थित राहत आहेत. प्रथम वर्षी अतिरुद्ध महादेव रुद्राभिषेक झाला. दुसरे वर्षी अशुतोष महादेव रुद्राभिषेक झाला. आता तिसऱ्या वर्षी पूर्ण मुक्तेश्वर महादेव अभिषेक होत आहे , ही संकल्पना पंडित पुरुषोत्तम जोशी महाराज यांनी केली आहे. सर्वांनी या रुद्राभिषेक बसण्यासाठी गुरुजींनी आवाहन केले आहे. तसेच विशेष म्हणजे पंडित पुरुषोत्तम जोशी गुरुजी यांनी ऑपरेशन सिंदूर निमित्त नाशिक रोड देवळाली कॅम्प परिसरातील सत्तर जवानांचा सत्कार केला कदम लॉन्स येथे आयोजित या कार्यक्रमास नाशिक रोड देवळाली कॅम्प परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### बिटको विद्यालयात स्मार्ट क्लासचे उदघाटन

**नाशिक (मोरवाडी) ।** स्वामी विवेकानंद सोसायटी संचलित श्रीमान टी. जे. चौहान (बिटको) माध्यमिक विद्यालय येथे 'युवा अनस्टॉपेबल' या अग्रगण्य संस्थेच्या सहकार्याने



स्मार्ट क्लास (इ-लर्निंग) सेट उपलब्ध करून देण्यात आला. या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका उज्वला माळी यांच्या हस्ते नव्या स्मार्ट क्लासचा शुभारंभ करण्यात आला. उद्‌घाटनप्रसंगी बोलताना माळी मॅडम यांनी विद्यालयाच्या तांत्रिक प्रगतीचे महत्व अधोरेखित केले. संगणक विषयाचे प्रमुख यशवंत गावित यांनी उपस्थितांना स्मार्ट क्लासच्या वापराची सविस्तर माहिती देऊन त्याच्या शैक्षणिक उपयोगांविषयी मार्गदर्शन केले. 'युवा अनस्टॉपेबल' संस्थेचे पदाधिकारी विनोद सूर्यवंशी, संदीप हंडे तसेच विद्यालयाचे माजी विद्यार्थी व नामवंत हॉलीबॉल खेळाडू भावेश कोळंबे यांच्या पुढाकारातून विद्यालयाला सुमारे १.५० लाख रुपये किंमतीचा इ-लर्निंग सेट आणि मोठ्या आकाराचे १५ नवे बेंचेस मिळाले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक व तांत्रिक शिक्षणासाठी एक नवीन दिशा प्राप्त झाली आहे. या कार्यक्रम प्रसंगी शाळेचे पर्यवेक्षक कीर्तिकुमार गहाणकरी, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# केटीएचएम महाविद्यालयाचा पहिलवान ग्रीसमध्ये खेळणार कुस्ती

## इशम देशमुखची जागतिक ग्रॅपलिंग स्पर्धेसाठी निवड

**नाशिक ।** अवघ्या जिल्ह्यालाच नव्हे तर संपूर्ण देशासाठी अभिमानास्पद अशी कामगिरी नाशिकमधील मविप्र संचलित केटीएचएम महाविद्यालयातील कु.इशम संतोष देशमुख या विद्यार्थ्याने केली आहे. थेट आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली चमक दाखवत ग्रीस येथे होणाऱ्या जागतिक ग्रॅपलिंग (कुस्ती) स्पर्धेसाठी या पाहिलवानाने आपले स्थान निश्चित केले आहे.

या अद्वितीय कामगिरीबद्दल मविप्र पदाधिकारी, संचालक, सभासद, शिक्षणाधिकारी,प्राध्यापकवृंद यांच्यासह सर्वच स्तरातून त्याचे कौतुक होत आहे. इशम संतोष देशमुख हा केटीएचएम महाविद्यालयातील बारावी विज्ञान शाखेचा




विद्यार्थी असून, या खेळाडूने आधीपासूनच जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केलेले आहे. सुवर्ण व रौप्य पदकांचीदेखील कमाई केली आहे. त्याच्या यशामागे सततचा सराव, मेहनत, प्रशिक्षकांचे योग्य मार्गदर्शन, महाविद्यालय व्यवस्थापन आणि कुटुंबाचे प्रोत्साहन या बाबी महत्वाच्या आहेत. ही स्पर्धा १ ते ५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत लोत्राकी, ग्रीस येथे (United World Wrestling (UWW) या आंतरराष्ट्रीय महासंघाच्या अधिकृत मान्यतेने आयोजित करण्यात आली आहे. इशम देशमुख हा १९ वर्षांखालील वयोगटात आणि ११० किलो खालील वजनी गटात भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. नाशिक जिल्ह्यातील खेळाडूची रॅपलिंग या जागतिक कुस्ती स्पर्धेकरिता निवड होणे, ही ऐतिहासिक बाब आहे.

या खेळाडूंना भारताचे प्रतिनिधित्व करण्याची ही संधी असून, ते सध्या कसून सरावात व्यस्त आहेत. मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर,अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे, उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी व सर्व संचालक, शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव, केटीएचएमचे प्राचार्य डॉ. एस. एस. काळे, शिक्षणाधिकारी तथा उपप्राचार्य डॉ. कैलास शिंदे, कनिष्ठ महाविद्यालयीन विभागप्रमुख प्रा. किरण रेडगांवकर, प्रा. दिलीप गावले, प्रा. रामनाथ पवार, क्रिडाशिक्षक प्रा. अविनाश कदम यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# गावात शिक्षण, जागतिक कंपन्यांत करिअर!





## एसएमबीटी फार्मसीच्या ७२ विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण होण्याआधीच 'जॉब कॉल'

**नाशिक ।** एसएमबीटी कॉलेज ऑफ फार्मसी व एसएमबीटी इन्स्टिट्युट ऑफ डिप्लोमा फार्मसीच्या तब्बल ७२ विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. विशेष म्हणजे, शिक्षण पूर्ण होण्याआधीच अनेक विद्यार्थ्यांच्या हातात नोकरी असून अडीच लाख रुपये ते १० लाख रुपये प्रतिवर्ष अशा वार्षिक पॅकेजवर विद्यार्थ्यांना संधी मिळाल्याचे महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. योगेश उशीर यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या अतुलनीय यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले जात असून, अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अधिक माहिती अशी की, एसएमबीटी शैक्षणिक संकुल येथे एसएमबीटी कॉलेज ऑफ फार्मसी व एसएमबीटी इन्स्टिट्युट ऑफ डिप्लोमा फार्मसी असे दोन औषधनिर्माण महाविद्यालय आहेत. याठिकाणी तब्बल दरवर्षी १२० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. दोन्हीही महाविद्यालये गेल्या 20 वर्षापासून या ठिकाणी सुरु आहे. तब्बल १५ पेक्षा अधिक स्टाफ हा पीएचडी धारक आहे. महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच अनेक प्रकारच्या उपक्रमांत सहभागी करून घेतले जाते, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये लीडरशिप स्किल्स आपसूक प्राप्त होतात तसेच विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या देशामध्ये प्रतिनिधित्व करता येते त्यामुळे गुणवत्तेतदेखील वाढ आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये ठसा उमटविण्यात विद्यार्थ्यांना यश आल्याचे डॉ. उशीर म्हणाले. एसएमबीटी कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये गेल्या पाच वर्षांत ३०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण होण्याआधीच नोकऱ्या मिळाल्या आहेत. विशेष म्हणजे, अनेक विद्यार्थ्यांची इतर देशांमध्ये उच्च शिक्षणासाठी निवड झाली आहे. अनेक ठिकाणी उच्च पदांवर हे विद्यार्थी कार्यरत आहेत. मेडिकल क्षेत्र जसजसे वाढत चालले आहे तशा स्पर्धादेखील वाढल्या असून, अनेक कंपन्या नवनव्या उपक्रमांत सहभागी विद्यार्थ्यांच्या मुलाखतीसाठी दरवर्षी इच्छुक असतात. गेल्या दोन वर्षांत तब्बल ४ वेळा विविध कंपन्यांनी या ठिकाणी भेटी देत विद्यार्थ्यांची निवड केली आहे. याठिकाणी स्वतंत्र प्लेसमेंट ड्राईव्ह विभाग असल्यामुळे विद्यार्थीकेंद्रित दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते.

महाविद्यालयाचा बँकॉक येथील महीडॉल युनिव्हर्सिटी, थायलंड येथील प्रिन्स ऑफ सोंग्क्ला युनिव्हर्सिटी, नेपाळ येथील काठमांडू युनिव्हर्सिटी, गंदकी मेडिकल कॉलेज पोखरा नेपाळ, मलेशिया येथील इंटरनॅशनल इस्लामिक युनिव्हर्सिटी, इंडोनेशिया मलाहयाती युनिव्हर्सिटी इंडोनेशिया) व लोट्स होलिस्टिक हेल्थ सेंटर (युएई) यांच्याशी उच्च शिक्षण, संशोधन आणि स्टुडंट एक्स्चेंज करार झालेले झालेले आहेत.

### विद्यार्थी केंद्रित उपक्रमांना प्राधान्य

शिक्षणासोबत नेतृत्वगुण, संवाद कौशल्य आणि जागतिक व्यासपीठावर सादरीकरण करण्यासाठी महाविद्यालया GPAT, NIPER मार्गदर्शन, रिसर्च प्रकल्प, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी विनिमय, सॉफ्ट स्किल ट्रेनिंग, अल्युमनी कनेक्ट, उद्योगदौरे, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आदी विद्यार्थ्यांना सशक्त करणारे उपक्रम वर्षभर राबवले जातात.

### या कंपन्यांचा समावेश

सिप्ला, आयपीसीए, एफडीसी, रॅनबॅक्सी, ब्ल्यू क्रॉस, टीसीएस, मॅक्लिओड्स, मायलन, ग्लेनमार्क, ग्लॅक्सो, सायटेक, गिब्स, डब्ल्यूएनएस, अपोलो वेलनेस, सन्डोज आणि युनिकेम लॅबोरेटरी इ. औषधनिर्माण क्षेत्रातील नामांकित कंपन्यांचा समावेश आहे.

### शिक्षण, संस्कार आणि संधी यांचा संगम

"विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक गुणवत्ता नव्हे, तर औद्योगिक ज्ञान, संवाद कौशल्य, आणि जागतिक स्तरावर प्रतिनिधित्व यामध्ये आपला ठसा उमटवला आहे. आमचे प्रशिक्षित प्राध्यापक, प्रात्यक्षिक उपक्रमांवर आधारित शिक्षण, आणि देशविदेशातील वेगवेगळ्या विद्यापीठांसोबतच्या सहयोगामुळे हे शक्य झाले आहे.

**- डॉ. योगेश उशीर, प्राचार्य, एसएमबीटी औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय**

# ट्रम्प टॅरिफमुळे सोने आणखी महागणार?

**ऑगस्ट महिन्यात सोन्याच्या किमती दररोज सरासरी ५०० रुपयांनी वाढत आहेत. ८ ऑगस्ट रोजी २४ कॅरेट सोन्याचा भाव पहिल्यांदाच १,०१,४०६ रुपये प्रति १० ग्रॅमवर पोहोचला. फक्त ७ दिवसांपूर्वी म्हणजे १ ऑगस्ट रोजी तो ९७,९७१ रुपये होता. २०२५ मध्ये सोने आतापर्यंत किती महागले आहे, ट्रम्प यांचे टॅरिफ किमती आणखी वाढवतील का आणि आता काय? सोने खरेदी करणे फायदेशीर आहे का?**

--------------

इंडियन बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन नुसार, १ जानेवारी २०२५ रोजी १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याची किंमत ७६,१६२ रुपये होती. भारतातील या किमती आतापर्यंतच्या उच्चांकी होत्या. पण एका महिन्यानंतर सोन्याची किंमत ६,००० रुपयांपेक्षा जास्त वाढली आणि १ फेब्रुवारी रोजी ती ८२,००० रुपये ओलांडली. त्यानंतर दरमहा सोन्याच्या किमती वाढतच गेल्या.

आयबीजेएच्या मते, जूनमध्ये सोन्याचा भाव ९५,००० रुपयांच्या पुढे गेला. जुलैमध्ये काही किमती स्थिर राहिल्या. परंतु ऑगस्टमध्ये पुन्हा एकदा वेगाने वाढ दिसून आली. ८ ऑगस्ट रोजी सोन्याच्या किमतीत ७०३ रुपयांची वाढ झाली आणि ती १,०१,४०६ रुपये प्रति १० ग्रॅम झाली. आतापर्यंतच्या सोन्याच्या किमतींमधील हा सर्वोच्च उच्चांक आहे. तथापि, ८ ऑगस्टच्या संध्याकाळपर्यंत सोन्याचा भाव ४६४ रुपयांनी घसरून १,००,९४२ रुपये प्रति १० ग्रॅम झाला.

केडिया ॲडव्हायझरीचे संचालक आणि व्यवसाय तज्ज्ञ अजय केडिया यांच्या मते, या वर्षी भारतात सोने महाग होण्याची ४ मुख्य कारणे आहेत.

जागतिक अस्थिरतेमुळे सोन्याची मागणी वाढली भारतातील सोन्याच्या किमती जागतिक बाजारपेठेवर अवलंबून असतात, कारण भारत त्याच्या गरजेच्या जवळपास निम्मे उत्पादन करतो. ९०% सोने आयात केले जाते. भारतात सोन्याचे उत्खनन खूपच मर्यादित आहे. यामुळे, जागतिक बाजारात सोन्याच्या किमती वाढल्याने, भारतातही सोने महाग होते.

वर्ल्ड गोल्ड कौन्सिलनुसार, भारतात सोन्याची मागणी दरवर्षी सुमारे ८०० टन आहे. भारताने २०२४ मध्ये ७१२.१ टन सोने आयात केले होते, जे २०२३ मध्ये ७४४ टनांपेक्षा ४% कमी होते. भारत अमेरिकेतून सर्वाधिक सोने खरेदी करतो. भारताच्या वाणिज्य मंत्रालयाच्या मते, २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारत अमेरिकेतून ३.२७ लाख कोटी रुपयांचे सोने आयात करेल. २०२३ च्या तुलनेत ४९% जास्त सोने खरेदी केले.

या वर्षी जानेवारीपासून जागतिक अर्थव्यवस्थेचा अंदाज लावणे कठीण झाले आहे. अमेरिका आणि चीनमधील व्यापार युद्ध, मध्य पूर्वेतील इस्त्रायल आणि हमास यांच्यातील संघर्ष, रशिया-युक्रेन युद्ध आणि ट्रम्पच्या शुल्कामुळे गुंतवणूकदारांनी सोन्यात गुंतवणूक केली. सोन्याला सुरक्षित गुंतवणूक मानले जाते, म्हणूनच जागतिक संकटाच्या काळात त्याची मागणी वाढली.

भारतात सोने बहुतेक परदेशातून खरेदी केले जाते आणि त्याचे पेमेंट अमेरिकन डॉलरमध्ये केले जाते. परंतु जर भारतीय रुपया डॉलरच्या तुलनेत कमकुवत झाला तर सोने खरेदी करण्यासाठी अधिक रुपये द्यावे लागतात. यामुळे भारतात सोने खरेदी करणे महाग झाले.

जानेवारी ते ऑगस्ट या कालावधीत डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया कमकुवत झाला, कारण परदेशी गुंतवणूकदार भारतातून त्यांचे पैसे काढून घेत आहेत. त्यामुळे रुपयाचे मूल्य २-३% ने कमी झाले. ऑगस्ट २०२५ मध्ये १ डॉलरची किंमत ८३.५ रुपयांवरून ८७.६० रुपयांवर पोहोचली. त्यामुळे सोने आयात करण्याचा खर्च वाढला.

महागाई वाढल्याने सोन्यातील गुंतवणूक वाढते जेव्हा महागाई वाढते तेव्हा लोक सोन्यात गुंतवणूक करतात कारण ते महागाईपासून सुरक्षित असते. गुंतवणूक महत्त्वाची असते. त्यामुळे मागणी वाढते आणि किमती वाढतात.

मार्च २०२५ मध्ये जेव्हा भारतातील किरकोळ महागाई ६% च्या जवळ पोहोचली तेव्हा गुंतवणूकदारांनी सोन्यात गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. आयबीजेएच्या मते, २८ मार्च रोजी सोन्याचा भाव ९९,१०० रुपये प्रति १० ग्रॅम या सर्वोच्च पातळीवर होता. फुगावाने सोन्याच्या किमती ४,००० ते ५,००० रुपयांनी वाढवल्या. लोकांनी तेल आणि अन्नपदार्थांऐवजी सोन्यात गुंतवणूक केली.

केंद्रीय बँकांच्या धोरणांमुळे आणि व्याजदरांमुळे सोने महागले जेव्हा व्याजदर कमी असतात तेव्हा सोन्यातील गुंतवणूक वाढते कारण बँक ठेवी कमी




परतावा देतात. यामुळे सोन्याची मागणी आणि किमती वाढणे निश्चित आहे. जून २०२५ मध्ये अमेरिका आणि यूकेसारख्या देशांनी व्याजदर कमी केले, ज्यामुळे सोन्यातील गुंतवणूक वाढली.

अमेरिकेने व्याजदर ०.२५% ने कमी केले, ज्यामुळे गोल्ड ईटीएफमधील गुंतवणूक वाढली. भारतातही रिझर्व्ह बँकेन व्याजदर स्थिर ठेवले. आयबीजेएच्या मते, जूनमध्ये सोन्याचा भाव ९७,६०९ रुपयांवरून जुलैमध्ये १,००,६८९ रुपये प्रति १० ग्रॅम झाला, जो त्यावेळी आतापर्यंतचा सर्वोच्च होता.

शिवाय, भारतात सण आणि लग्नाच्या काळात सोन्याची मागणी वाढते, कारण सोन्याला सांस्कृतिक महत्त्व आहे. यावर्षी सणांमुळे सोन्याच्या किमती प्रति १० ग्रॅम ३,००० ते ४,००० रुपयांनी वाढल्या. ट्रम्पच्या टॅरिफमुळे सोन्याच्या किमती अजूनही वाढतील असे तज्ञांचे मत आहे

स्वित्झर्लंड हे जगातील सर्वात मोठे सोने शुद्धीकरण केंद्र आहे, जे जगातील ७०% सोने शुद्ध करते. म्हणजेच, स्वित्झर्लंड कच्चे सोने घेते आणि ते चमकदार बार किंवा नाण्यांमध्ये परिष्कृत करते.



अमेरिका हा या सोन्याचा सर्वात मोठा खरेदीदार आहे. डिसेंबर २०२४ मध्ये अमेरिकेने स्वित्झर्लंडमधून ६४.२ टन सोने आयात केले.

ट्रम्प हे फेब्रुवारी २०२५ मध्ये पहिल्यांदा स्वित्झर्लंडवर कर लादण्याबद्दल बोलले, ज्यामुळे लोकांनी सोन्याचा साठा करायला सुरुवात केली. जगात सोन्याची मागणी वाढली आणि सोने महाग झाले. कर लावण्याच्या बातम्यांमुळे अमेरिकेत सोन्याचे भाव लंडनपेक्षा जास्त झाले. लंडनच्या तुलनेत न्यू यॉर्कमध्ये सोने प्रति औंस ४० डॉलरने महाग झाले.

स्वित्झर्लंडमधील व्यापाऱ्यांनी या फरकाचा फायदा घेण्यासाठी मनमानी सुरू केली, म्हणजेच इतर देशांपेक्षा अमेरिकेत जास्त सोने पाठवण्यास सुरुवात केली. यामुळे, जगभरातील सोन्याचा पुरवठा थोडा कमी झाला आणि भारतात सोने आयात करणे महाग झाले.

अजय केडिया यांच्या मते, ट्रम्प यांनी स्वित्झर्लंडवर ३९% कर निश्चित केला आहे. त्यामुळे स्विस व्यापाऱ्यांना सोने विकण्यात अडचणी येतील. जर मागणी वाढली आणि पुरवठा पूर्ण होऊ शकला नाही, तर सोने अधिक महाग होईल. तथापि, किती महाग आहे हे सध्या सांगणे कठीण आहे.

जरी जागतिक बाजारपेठेतील परिस्थिती सतत बदलत असली तरी, हे देखील लक्षात ठेवले पाहिजे की सोन्यातील कोणतीही मोठी गुंतवणूक ही आर्थिक बाजारपेठेतील मोठ्या खेळाडूंच्या दयेवर असते. मोठे खेळाडू काहीही करतात, त्याचा परिणाम सोन्याच्या किमतींवर दिसून येतो. म्हणून विचारपूर्वक सोन्यात गुंतवणूक करावी.

अजय केडिया म्हणाले, सोन्याने आधीच ३०% परतावा दिला आहे. जेव्हा असे होते, तेव्हा बाजारात सोन्याची रिप्लेसमेंट येते आणि मागणी कमी होते. अशा परिस्थितीत, जर तुम्हाला बचतीसाठी सोने खरेदी करायचे असेल, तर ठीक आहे, पण गुंतवणुकीसाठी चांदी चांगली आहे. या वर्षी चांदीमध्ये जास्त परतावा अपेक्षित आहे.

तथापि, अनुज गुप्ता म्हणतात, सध्या सोने खरेदी करणे हा एक चांगला पर्याय आहे. ट्रम्प यांनी शुल्क लादले आहे, भू-राजकीय तणाव सुरूच आहे, जागतिक बाजारपेठेत चढ-उतार तसेच आहेत आणि अनेक देशांमध्ये युद्ध सुरू आहे. अशा परिस्थितीत, शक्य तितके सोने खरेदी करून साठवले पाहिजे. आता सोने खरेदी करण्याची वेळ आहे, ते विकण्याची नाही.

**जागतिक बाजारपेठेत सोन्याच्या किमतींचा कल**

कोणत्याही देशातील सोन्याची किंमत त्याच्या आंतरराष्ट्रीय दराच्या आधारे ठरवली जाते. आंतरराष्ट्रीय स्तरावर, लंडन बुलियन मार्केट असोसिएशन सोन्याची किंमत निश्चित करते आणि नियंत्रित करते. ते इतर देशांशी जवळून काम करते. २४ कॅरेट शुद्धतेच्या सोन्याचा प्रति औंस दर डॉलरमध्ये निश्चित केला जातो. एक औंस २८.३ ग्रॅम आहे.

एलबीएमएनुसार, जानेवारीमध्ये सोन्याची किंमत प्रति औंस $२,६३३ होती, जी एप्रिलपर्यंत वाढून $३,२३० प्रति औंस झाली. औंस झाले. या काळात सोन्याच्या किमतीत चढ-उतार दिसून आले. फेब्रुवारीमध्ये सोन्याची सर्वाधिक किंमत $२,९३६ प्रति औंस होती, तर मार्चमध्ये सर्वात कमी $२,८८० प्रति औंस होती. तथापि, एप्रिलनंतर त्यात सतत वाढ दिसून आली. ८ ऑगस्ट रोजी सोन्याची किंमत $३,३८३ प्रति औंस होती.

**सोने महागणार की स्वस्त होणार?**

वेल्थ रिसर्च अँड ॲडव्हायझरी' या गुंतवणूक फर्मचे संचालक अनुज गुप्ता यांच्या मते, २०२५ मध्येही किंमती वाढतच राहतील. या वर्षीच सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम १.१० लाख रुपयांच्या पुढे जाऊ शकतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर सोन्याचा भाव प्रति औंस ३,५०० डॉलर्स असू शकतो. याची ३ मुख्य कारणे आहेतः

**ट्रम्प यांची सततची टॅरिफ वाढ :**
ट्रम्प यांनी भारतावर ५०% आणि स्वित्झर्लंडवर ३९% टॅरिफ लादला. यामुळे जगभरातील सोन्याच्या पुरवठ्यावर परिणाम होत आहे. स्वित्झर्लंड आता अमेरिकेत कमी सोने आयात करेल, ज्यामुळे जागतिक बाजारात सोन्याचे भाव वाढतील. यामुळे भारतातील सोन्याचा आयात खर्चही वाढेल.

**भारतातील सणांचा हंगाम :**
धनतेरस, दिवाळी आणि लग्नाचा हंगाम ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये सुरू होईल, त्यामुळे भारतात सोन्याची मागणी वाढेल. भारत दरवर्षी ८०० टन सोने खरेदी करतो आणि सणांच्या काळात त्याचा वाटा ३०% असतो.

आयबीजेएच्या मते, २०२४ मध्ये धनतेरस दरम्यान सोन्याच्या किमती प्रति १० ग्रॅम २००० रुपयांनी वाढल्या. लग्नसराईच्या काळात भारतात सोन्याची मागणी वाढेल.

**फेडरल रिझर्व्ह व्याजदर कमी करू शकतेः**
अमेरिकन फेडरल रिझर्व्ह बँक व्याजदर कमी करू शकते, ज्यामुळे भविष्यात सोन्याच्या किमती वाढतील. व्याजदर वाढल्यामुळे सोन्याची खरेदी कमी झाली आहे कारण ते कमी नफा देते. सध्या यूएस फेडरल रिझर्व्हचे लक्ष्य ४.२५% ते ४.५०% दरम्यान आहे.

अनुज गुप्ता यांच्या मते, ₹ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉरमुळे तांबे आणि ॲल्युमिनियमसारखे अनेक धातू अजूनही महाग होतील. तांबे आणि ॲल्युमिनियमसोबतच चांदीचा वापर उद्योगांमध्येही केला जातो. अशा परिस्थितीत चांदीची मागणी वाढली आहे.

चांदीचा वापर केवळ दागिने आणि गुंतवणुकीसाठीच केला जात नाही, तर ती उद्योगांमध्येही वापरली जाते. जेव्हा या उद्योगांमध्ये उत्पादन वाढते तेव्हा चांदीची मागणीदेखील वाढते. सिल्व्हर इन्स्टिट्यूटच्या आकडेवारीनुसार, २०२३-२५ मध्ये चांदीची मागणी २०% वाढण्याची अपेक्षा आहे.

'एसएस वेल्थ स्ट्रीट' या वित्तीय कंपनीच्या संचालिका सुगंधा सचदेवा म्हणतात की, सोलर पॅनेल, इंटरनेटची ५जी तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंची वाढती मागणी यांचा चांदीच्या किमतीवर परिणाम होईल. पुढील काही महिन्यांत भारतीय बाजारपेठेत चांदीची किंमत १.२५ लाख रुपये प्रति किलोपेक्षा जास्त होईल.

# घरी आलेले इन्कमटॅक्स अधिकारी सर्व्हेक्षणाचे रूपांतर धाडीत करू शकतात का?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना.




गेल्यावेळेस आपण सर्व्हेबद्दल सविस्तर जाणून घेतले. आज सविस्तर चर्चा करणार आहोत की, सर्व्हे करण्यासाठी आलेले इन्कमटॅक्स अधिकारी त्या सर्व्हेर्ला धाडीत रुपांतर करू शकतात का? हे आपण सोप्या भाषेतील प्रश्नोत्तर रुपात बघणार आहोत.

**प्रश्न** - सर्व्हेक्षण साठी आलेले इन्कमटॅक्स अधिकारी स्वेच्छाने सर्व्हेक्षणाचे रुपांतर धाडीत करू शकतात का?

■ सर्व्हेक्षण म्हणजे दुसऱ्या भाषेत सर्व्हे म्हणतात. यालाच आपण सोप्या भाषेत तपासणी म्हणू शकतो. आता वरील प्रश्नाचा अर्थ असा आहे की फक्त तपासणीसाठी आलेले इन्कमटॅक्स अधिकारी त्या तपासणी कारवाईला वाढवून त्याचे रुपांतर धाडीत करू शकतात का?

यासाठी मोतीलाल अँड सन्स विरुद्ध डीपार्टमेन्ट ऑफ इन्कमटॅक्स (I.T.A. No. 1082 (Del) of 2007) या केसचा संदर्भ बघणे गरजेचे आहे. या केसमध्ये मोतीलाल अँड सन्स या करदात्याचा सर्व्हे चालू होता. त्यांच्या तपासणीमध्ये इन्कमटॅक्स अधिकारी यांना बुक्स ऑफ अकांउट (पुस्तके) मध्ये ४८,४३,७४८/- रुपयांचा फरक दिसून आल्याने अधिकाऱ्याने लगेच सर्व्हेर्चे रुपांतर धाडीत केले.

मोतीलाल अँड कम्पनी यांनी इन्कमटॅक्स डिपार्टमेन्टच्या या निर्णयाच्या विरोधात ट्रीन्युनलमध्ये अपील केले. तेथे कंपनीने सांगितले की, सोन्याच्या बांगड्या, अंगठ्या तथा ब्रासलेट याचा स्टॉक ५ कोटीच्या वर आहे. इन्कमटॅक्सवाल्यांनी याचे ग्रॉस वजन म्हणजे Gross weight धरले आहे जे की सारासर चुकीचे आहे.

निव्वळ वजन म्हणजे Net weight डीपार्टमेन्टने घेतले नसल्यामुळे त्यांना ४८,४३,७४८/- इतक्या रकमेचा फरक सापडत आहे. त्यात डोरी, आर्टीफिशियल (नकली) स्टोन आणि लाख (एक धातु) याचे वजन कमी केलेले नाही. मोतीलाल कंपनीचे तर्क झवितर्क दिल्ली ट्रिब्युनलमध्ये यांनी मान्य केले तथा इन्कमटॅक्स अधिकाऱ्याने केलेली केस रद्द करून संपूर्ण टॅक्सची अतिरिक्त मागणी रद्द केली.

इतकेच नाही तर दिल्ली कोर्टाने इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांवर ताशेरेही ओढले. त्यांनी सांगितले की, इन्कमटॅक्स अधिकारी अशी मनमानी तथा स्वेच्छाचारी कार्य करू शकत नाहीत. कोर्टाने ताशेरे ओढतांना Arbitrary हा शब्द वापरला तथा आदेशामध्ये म्हंटले की

"Sometimes, a Survey is Converted into a search operation But it should not be arbitrarily done, as in this Case." म्हणजेच इन्कमटॅक्स वाल्यांनी सर्वेक्षणाला धाडीत बदलतांना मनमानी कारभार करू नये.

**प्रश्न** - एस. पी. कार्थिक या केसमध्ये मद्रास हायकोर्टाने धाडीबद्दल काय निर्णय दिला?

■ एस.पी. कार्थिक विरुद्ध कमीशनर ऑफ इन्कमटॅक्स (2023) 147 taxman.com 287 (Mad) या केस ची माहिती अशी की सर्च मध्ये करदात्याने अधिकाऱ्यांना खूप समजवण्याचा प्रयत्न केला की जी एकूण ज्वेलरी जप्त करण्यात आली आहे, त्यापैकी काही भाग वडिलोपार्जित आहे. परंतु, अधिकाऱ्यांनी त्या म्हणण्यास दाद दिली नाही व टॅक्स लावले. परंतु असे Revenue चे म्हणणे होते की त्यांना तसा पुरावा पाहिजे होता; जो करदात्याकडे नव्हता.

कार्थिक यांनी वेल्थ टॅक्स रिटर्नबद्दल माहितीत सांगितले की, १-४- ९२ पासून संपती कर लागू नसल्यामुळे त्यांना रिटर्न भरण्याची गरज पडली नाही. मद्रास उच्च न्यायालयाने त्यांच्याकडील जप्त झालेल्या १०३५.९५ ग्रॅम ज्वेलरीपैकी 450 ग्रॅम हे वडिलोपार्जित म्हणून सोडण्यात आले तथा उर्वरित ५८५.९५ ग्रॅम हे unexplained ज्वेलरी असे धरून यावर टॅक्स लावण्यात आले. तसेच १२.०५ कॅरेटचे हिरे (डायमंड) ज्वेलरी यास मान्य करून उर्वरित २.०५ कॅरेट हिरे जवाहरातवर Unexplained Diamond म्हणून टॅक्स लावण्याची अनुमती दिली.

पुढील लेखमालेत आपण आणखी कोर्टाच्या नवीन निर्णयाची माहिती जाणून घेणार आहोत. ज्यामुळे आपल्या निदर्शनास येईल की, इन्कमटॅक्समध्ये जास्त घाबरायाचे कारण नसते. प्रत्येक गोष्टीचा पुरावा तथा उहापोह केल्यास इन्कमटॅक्स अधिकारी करदात्याचे म्हणणे ऐकतात. जर त्यांनी करदात्याच्या म्हणण्यास दाद दिली नाही तर कोर्टात न्याय मिळण्याची शक्यता जास्त असते.

ज्या वाचकांना काही प्रश्न विचारायचे असतील त्यांनी आपल्या पुर्ण नावासह 9422218428 या नंबरवर फक्त whatsapp message करावे म्हणजे त्यांची उत्तरे निःशुल्क लेखमालेत प्रसिध्द केली जाईल.

■ ■ ■

# कैद्यांना पेट्रोल पंपावर काम करण्याची शिक्षा



**आगळंवेगळं**

हरियाणा सरकारने एक अनोखा उपक्रम सुरू केला आहे. आता करनालसह अनेक जिल्ह्यांमधील तुरुंगाबाहेरील पेट्रोल पंप कैदी चालवत आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे आतापर्यंत एकही कैदी येथून पळून गेलेला नाही.

या उपक्रमामुळे कैद्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात पुन्हा सामील होण्याची संधी मिळते. तुरुंग अधीक्षकांच्या मते, या कामासाठी फक्त चांगल्या सवयी असलेल्या कैद्यांची निवड केली जाते. ते सकाळी ७ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत काम करतात आणि दररोज ९०-१०० रुपये कमवतात, जे थेट त्यांच्या खात्यात जमा केले जातात. हरियाणाचे डीजीपी जेल मोहम्मद अकील यांनी याला 'जीवन बदलणारा उपक्रम' असे वर्णन केले आहे. अंबाला, यमुनानगर आणि हिसार सारख्या शहरांमध्येही याची पुनरावृत्ती झाली आहे.

■ ■

# मराठमोळा सुपरस्टार!



**अभय गोखले**

बंगलोरमध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या बसमध्ये कंडक्टरची नोकरी करणारा एक युवक मोठे स्वप्न उराशी बाळगून मद्रासमध्ये गेला आणि त्याची गाठ सुप्रसिद्ध दिग्दर्शक के बालचंदर यांच्याशी पडली. के.बालचंदर यांनी त्या युवकाला अपूर्व रागंगळ या आपल्या चित्रपटात एक छोटासा रोल दिला. त्या छोट्याशा रोलमध्येही त्या युवकाने आपली आगळीवेगळी छाप पाडली आणि तेथून सुरू झालेला त्याचा प्रवास सुपरस्टारच्या शिखरापर्यंत पोहोचला.

विशेष म्हणजे अपूर्व रागंगळ या चित्रपटात कमल हासन यानेही काम केले होते. हा चित्रपट जेंव्हा बंगलोरमध्ये रिलीज झाला तेंव्हा तो पाहण्यासाठी तो युवक जेंव्हा चित्रपटगृहात गेला तेंव्हा त्याला आपले अश्रू आवरता आले नाहीत. अर्थात ते आनंदाश्रू होते. अखेर रूपेरी पडद्यावर त्याची एंट्री झाली होती. त्यानंतर त्याने कधीच मागे वळून पाहिले नाही.

शिवाजीराव गायकवाड, अस्सल मराठमोळा माणूस. शिवाजीरावचा रजनीकांत कसा झाला, याची कहाणी अद्भूत आहे. दिग्दर्शक के बालचंदर यांनी जेंव्हा त्याला आपल्या चित्रपटात काम दिलं तेंव्हा त्यांच्या लक्षात आलं की तामिळ चित्रपट सृष्टीत शिवाजी नावाचे सुपरस्टार आहेत, ते म्हणजे शिवाजी गणेशन. त्यामुळे त्यांनी शिवाजीराव हे नाव बदलण्याचे ठरवले. त्यांनी त्याच्यासमोर तीन पर्याय ठेवले. श्रीकांत, चंद्रकांत आणि रजनीकांत असे तीन पर्याय होते. दिग्दर्शक के.बालचंदर यांनी पुर्वी दिग्दर्शित केलेल्या मेजर चंद्रकांत या चित्रपटात रजनीकांत नावाचे एक पात्र होते. त्यावरून रजनीकांत हे नाव शिवाजीराव यांना प्रदान करण्यात आले.अशा प्रकारे रजनीकांत या नावाचा जन्म झाला.

तामिळनाडूमध्ये चित्रपट सृष्टीतील नट नट्यांची मोठी क्रेझ आहे. शिवाजी गणेशन, एम.जी.रामचंद्रन, जयललिता, विजयकांत, कमल हासन आणि रजनीकांत या कलाकारांचे मोठ्या प्रमाणात फॅन्स आहेत. त्यांचे फॅन्स क्लब आहेत. यापैकी रजनीकांत याचा अपवाद वगळता इतर सर्व कलाकार राजकारणात सक्रिय झाले.एम.जी. रामचंद्रन आणि जयललिता हे कलाकार तामिळनाडूचे मुख्यमंत्री होते. रजनीकांत हे राजकारणात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा बऱ्याच वेळा झाल्या परंतु त्या शेवटी चर्चाच राहिल्या.

वरील स्टार कलाकारांच्या फॅन्सनी आपल्या आवडत्या कलाकारांची मंदिरेही बांधली. सुपरस्टार रजनीकांत याच्या काही चाहत्यांनी मध्यंतरी तामिळनाडू मधील मदुराई येथे रजनीकांतचे एक मंदिर बांधले आहे. या मंदिरात रजनीकांत याची ३०० किलो वजनाची मूर्ती बसवण्यात आली आहे.

रजनीकांतच्या एका चाहत्याने त्याच्या चित्रपट कारकिर्दीला ५० वर्षे पूर्ण झाली, या निमित्ताने त्या मंदिरात जाऊन, मूर्तीची विधिवत पूजा करून, मूर्तीला अभिषेक केला. एवढेच नव्हे तर त्याने रजनीकांतच्या निरनिराळ्या चित्रपटांतील छायाचित्रांनी ते मंदिर सजवले.

अशा प्रकारे अपूर्व रागंगळ या चित्रपटात १९७५ साली छोटीशी भूमिका करुन, तामीळ चित्रपट सृष्टीत प्रवेश करणाऱ्या रजनीकांतच्या चित्रपट कारकिर्दीला ५० वर्षे पूर्ण होत असताना, रजनीकांतची लोकप्रियता नवनवीन उच्चांक गाठत आहे. त्याच्या पुढील वाटचालीसाठी त्याला भरभरून शुभेच्छा.

■ ■ ■

# कबुतरांमुळे खरोखरंच आरोग्याला धोका?



दादरच्या कबुतरखाना हटवण्यावून जैन समाज आक्रमक झालेला दिसत आहे. जैन धर्मात कबुतरांना फार महत्त्वाचं स्थान देण्यात आलं आहे. तसेच काहीजणांना ती सवयही असते की कबुतरांसाठी धान्य खायल टाकायला जाणे. पण खरं पाहायला गेलं तर कबुतरांमुळे अनेक आजार पसरतात असं म्हटलं जातं. पण तुम्हाला माहिती आहे कबुतरांच्या संपर्कात राहणे म्हणजे स्वतःसाठी तसेच परिसरातील इतर लोकांसाठीही आरोग्यासाठी मोठा धोका निर्माण करणे.

हा आजार जो कधीकधी प्राणघातक ठरू शकतो. याचचं एक उदाहरण म्हणजे दिल्लीतील एका ११ वर्षाच्या मुलाला श्वास घेण्यास त्रास होत असल्याने सर गंगाराम रुग्णालयात दाखल करण्यात आले. सुरुवातीच्या तपासणीत डॉक्टरांना आढळले की त्या मुलाच्या फुफ्फुसात जळजळ आहे. त्यानंतर त्या मुलाची वैद्यकीय तपासणी करण्यात आली, ज्यामध्ये असे आढळून आले की त्या मुलाला हायपरसेंसिटिव्हिटी न्यूमोनिटिस नावाचा एक दुर्मिळ फुफ्फुसाचा आजार झाला आहे.

हा एक प्रकारचा न्यूमोनिया आजार आहे, जो कधीकधी प्राणघातक ठरू शकतो. डॉक्टरांना तपासणीत असे आढळून आले की फुफ्फुसांची ही गंभीर ॲलर्जीची समस्या मुलगा कबुतरांच्या विष्ठा आणि पंखांच्या संपर्कात बराच काळ राहिल्यामुळे झाली आहे.

**हायपरसेंसिटिव्हिटी न्यूमोनिटिस म्हणजे काय?**

कबुतरांमुळे होणारा हा आजार दरवर्षी कबुतरांच्या संख्येसह वाढत आहे. संशोधनानुसार, एक कबुतर वर्षाला ११.५ किलो शौच करतो. कबुतरांच्या शौचांशी संबंधित आजारांमध्ये क्रिप्टोकोकोसिस, हिस्टोप्लाज्मोसिस आणि सायटाकोसिस यांचा समावेश आहे. शौच साफ करताना निर्माण होणाऱ्या धुळीत श्वास घेतल्याने तुम्हाला या आजारांची लागण होऊ शकते. हायपरसेंसिटिव्हिटी न्यूमोनिटिस हा एक अतिशय धोकादायक आजार आहे. तो तीव्र झाला तर श्वास घेण्यास त्रास, खोकला, ऑक्सिजनची पातळी कमी होणे व सांधेदुखी होऊ शकते.

**हायपरसेंसिटिव्हिटी न्यूमोनिटिसचा धोका कोणाला जास्त असतो?**

कबुतर आणि इतर पक्ष्यांच्या संपर्कात येणाऱ्या लोकांना हा संसर्ग होण्याचा धोका जास्त असतो. हायपरसेंसिटिव्हिटी न्यूमोनिटिस पक्ष्यांच्या विष्ठा, मूत्र आणि त्यांनी सोडलेल्या अन्नाच्या कणांच्या संपर्कात येणाऱ्या लोकांना देखील होतो.

**त्वचारोग** : कबुतरांमुळे फक्त फुफ्फुसाचाच आजार नाही तर त्वचारोग देखील होऊ शकतो. कबुतरांच्या पिसांमुळे किंवा त्यांच्या पिसांमध्ये असणाऱ्या छोट्यामोठ्या किटकांमुळे त्वचारोग देखील होऊ शकतो. त्यामुळे कबुतरांना खायला देणे हे जरी एक चांगली सवय असली तरी देखील त्यामुळे आपल्या आरोग्याला होणारा धोका देखील होऊ शकतो ही बाब लक्षात घेतली पाहिजे.

■ ■ ■

**अशोकायन**

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## मी निर्भया बोलतेय!

शिवरायांच्या कर्मभूमित
महिलांवर होती अत्याचार
परस्त्री मातेसमानचे
लोप पावलेत का संस्कार?

माणसाच्या मनात
वसतो सुप्त सैतान
निर्भया म्हणते
भगीनींनो रहा सावधान..!

राखी पोर्णिमेच्या दिवशी
भावाला मागा ओवाळणी
कोणत्याही परस्त्रीची
करणार नाही छेडखानी..!

आई बहीण पत्नी
तुम्हालाही आहे
'मानव ' म्हणून जगण्याचे
कधी शिकणार आहे?

# मंत्रालयात १५ ऑगस्टपासून ऑफलाइन पास बंद

## डीजी ॲप नोंदणीनंतरच प्रवेश : विधिमंडळातही फेस रेकग्निशन सिस्टिम बसवण्याची तयारी



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :

राज्यातील विविध भागांतून मंत्रालयात कामासाठी येणाऱ्या नागरिकांना (अभ्यागतांना) येत्या १५ ऑगस्टपासून ऑफलाइन पास बंद करण्यात येणार आहेत. नागरिकांना प्रवेशासाठी डीजी ॲपवरच नोंदणी बंधनकारक आहे. त्यानंतरच मंत्रालयात प्रवेश मिळणार आहे. मंत्रालयात प्रवेश करण्यासाठी गार्डन गेटजवळील १० खिडक्यांवर ऑफलाइन पास दिले जात होते. मात्र, १५ ऑगस्टपासून खिडक्यांवरील ऑफलाइन पास देणे बंद करण्यात येणार आहेत.

कामानिमित्त मंत्रालयात येणाऱ्यांची गर्दी लक्षात घेता गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्य शासनाने फेस डिटेक्शन व डीजी प्रवेश ॲप प्रणाली अमलात आणली आहे. या दोन्ही प्रणालींमुळे मंत्रालयातील गर्दीवर नियंत्रण मिळवणे शक्य झाले आहे. डीजी ॲप मुळे मंत्रालयाची सुरक्षा, अभ्यागतांच्या वेळेची बचत, तासन्तास रांगेत उभे राहण्याची कटकट दूर होणार आहे. मंत्रालयाच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून हा निर्णय घेण्यात आल्याचे गृह विभागाच्या अधिकाऱ्याने सांगितले.

पावसाळी अधिवेशनात विधान भवनाच्या लॉबीत झालेला गोंधळ आणि हाणामारीनंतर आता विधान भवनाच्या सुरक्षेत तांत्रिक बदल घडवून आणण्याची हालचाल सुरू झाली आहे.

विशेष अधिकार समितीने याबाबत आढावा घेतला असून मंत्रालयाप्रमाणे विधान भवनातही फेस रेकग्निशन सिस्टिम बसवण्याची शक्यता तपासली जात आहे. विधान भवनातील शिस्त आणि सुरक्षितता अधिक काटेकोर करण्याच्या दृष्टीने पावले उचलली जात आहेत. अधिवेशनादरम्यान आमदार गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या हाणामारीच्या घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कठोर नियमावलीची तयारी सुरू आहे. विशेष अधिकार समितीने विधान भवन सुरक्षा यंत्रणेला फेस रेकग्निशन सिस्टिमबाबतचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

डीजी प्रवेश ॲप हे मोबाइल ॲप अँड्रॉइड आणि आयओएस ॲपल या दोन्ही प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. आपल्या मोबाइलच्या प्रणालीनुसार अँड्रॉइडमध्ये प्ले स्टोअरवर तर आयओएस ॲपलवर ॲपल स्टोअरवर सर्च केल्यास हे ॲप विनामूल्य डाऊनलोड करता येते. या ॲपवर सुरुवातीला केवळ एकदाच नोंदणी करणे आवश्यक राहील. नोंदणी झाल्यानंतर आधार क्रमांकावर आधारित यंत्रणेद्वारे छायाचित्राची ओळख पटवून नोंदणी पूर्ण केल्यानंतर ज्या विभागात काम आहे त्याचा स्लॉट बुक करून रांगेशिवाय प्रवेश मिळतो. या संपूर्ण प्रक्रियेला तीन मिनिटांपेक्षा कमी कालावधी लागतो.

# सासरच्या छळाला कंटाळून महिलेची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ९ :

फुरसुंगी, हडपसर येथे सासरच्या सततच्या छळाला कंटाळून २४ वर्षीय सीमा अक्षय राखपसरे या महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी पती अक्षय सुरेश राखपसरे, सासू आशाबाई सुरेश राखपसरे आणि चुलत सासरे यांच्यासह अन्य नातेवाईकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रवी खलसे (५०) यांनी फुरसुंगी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, सीमा आणि अक्षय यांचा काही महिन्यांपूर्वीच विवाह झाला होता. विवाहानंतर सीमाकडे माहेरहून पैसे आणण्याची मागणी करण्यात आली होती. तिला सातत्याने टोमणे मारून शारीरिक आणि मानसिक छळ करण्यात येत होता. या त्रासाला कंटाळून सीमाने राहत्या घरात पंख्याला ओढणी बांधून आत्महत्या केली.पोलीस उपनिरीक्षक बापूसाहेब खंदारे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. याचबरोबर लोणी काळभोर भागात कामावरून काढून टाकण्याच्या धमकीमुळे तुकाराम ज्ञानेश्वर भाले (३८) या व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी सुनील विजय कसबे (३२), करण सोमनाथ कसबे (२२) आणि अक्षय रामजीत केवट (३०) या तिघांना अटक करण्यात आली आहे. भाले यांच्या पत्नीने दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपी त्यांना सतत शिवीगाळ करत असत आणि कामावरून काढून टाकण्याची धमकी देत असत.

# भाजपच्या कार्यालयातून चालतो निवडणूक आयोग



शरद पवारांच्या गौप्यस्फोटाला आदित्य ठाकरेंचे समर्थन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :

विधानसभा निवडणुकीतील मतांची चोरी आणि निवडणूक आयोगावरच्या पक्षपातीपणाच्या आरोपांवरून महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा चढ-उतार सुरू झाले आहेत. शरद पवारांच्या 160 जागा जिंकून देण्याच्या प्रस्तावाविषयीच्या विधानाचे आदित्य ठाकरे यांनी समर्थन केले असून, शरद पवारांना राजकारणात खूप मोठा अनुभव आहे, त्यामुळे असे असू शकते, असे ते म्हणाले. तसेच वरळीत झालेल्या गोंधळावर त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना थेट सवाल केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी विधानसभा निवडणुकीबाबत मोठा गौप्यस्फोट केला आहे. निवडणुकीच्या आधी आमच्याकडे दोन माणसे भेटायला आली आणि 160 जिंकून देण्याचा प्रस्ताव दिला होता, असे ते म्हणाले. याबाबत आदित्य ठाकरे यांना विचारले असता, असे असू शकते, असे म्हणत शरद पवारांच्या गौप्यस्फोटाचे एकप्रकारे समर्थन केले.

आदित्य ठाकरे म्हणाले, शरद पवार साहेब अनेक वर्ष राजकारणात आहेत. त्यांचा अनुभव खूप मोठा आहे. त्यांनी आयुष्यात अनेक निवडणुका पाहिल्या आहेत. पहिल्यांदाज मतांची चोरी उघडपणे झालेली आहे. साधारणपणे निवडणूक आयोग भाजपच्या कार्यालयातून चालते, हे आता कळायला लागलेले आहे. आम्ही निवडणूक आयोगावर बोलतो आणि ते भाजपला झोंबते, अशी टीकाही त्यांनी केली. मतांची चोरी झाली की नाही, यासाठी खुलासा पाहण्याची गरज नाही. राहुल गांधी यांनी परवा काय खरे आणि काय खोटे हे पुराव्यानिशी दाखवले आहे, असेही आदित्य ठाकरे यांनी म्हटले.

दरम्यान, शुक्रवारी मुंबईतील वरळी परिसरात नारळी पौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरेआणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्याच व्यासपीठाजवळ पोहोचले आणि दोघांचेही समर्थक एकमेकांशी भिडले. काही काळ परिस्थिती तणावपूर्ण बनली, त्यामुळे वातावरण बिघडले. यावर आज आदित्य ठाकरे यांनी प्रतिक्रिया देताना एवढी भिती होती मग वरळीत आलात का? असा सवाल एकनाथ शिंदेंना केला.

# राहुल गांधींच्या खुलाशानंतर भाजपवर तोंड लपवण्याची वेळ : संजय राऊत



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :

लोकशाहीमध्ये तोंड लपवण्याची वेळ भाजपवर आली आहे. 50 मतदारसंघात भाजपचे उमेदवार कसे विजयी झाले हे राहुल गांधींनी काल पुराव्यासह दाखवले आहे. राहुल गांधींनी टाकलेल्या बॉम्बमुळे यांच्या अब्रूच्या चिंधड्या उडाल्या आहेत, हे कसले खुलासे करत आहे, जे झाले हे स्पष्ट आहे, असे उबाठाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे.

खासदार संजय राऊत म्हणाले की, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची जी युती आहे. हा इंडिया आघाडीचा विषय नाही. तो स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा विषय आहे. या निवडणुकीची राष्ट्रीय स्तरावर कधी चर्चा होत नाही, मग समोर महायुती असो की एनडीए. काही लोकांचे पक्षप्रमुख दिल्लीत असल्याने ते दिल्लीत जाऊन चर्चा करत असतील पण ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याचा विषयाचा आणि आघाडीचा काही संबंध आणि आक्षेप नाही.

खासदार संजय राऊत म्हणाले की, मराठीच्या प्रश्नावर महाराष्ट्र काँग्रेसची आणि आमची भूमिका एकच आहे. राजकीय दृष्टीने ठाकरे बंधू एकत्र आले याचा केंद्र बिंदू मराठी हाच आहे. शरद पवार असोत की हर्षवर्धन सपकाळ यांची भूमिका एकच आहे. आमच्यामध्ये मतभेद नाही. मुंबई वाचवण्यासाठी जर ठाकरे बंधूंनी घेतलेली भूमिका ही मराठी माणसांसाठी आनंदाची आहे. मनसेने परप्रांतीयांविरोधात भूमिका घेतलेली नाही.कधी काळी आमच्या विरोधातही हे आरोप होत होते. बंगालमध्ये तिथल्या भाषेसाठी आंदोलन सुरू आहे. तामिळनाडू मध्येही हे आंदोलन सुरू आहे तुम्ही महाराष्ट्रा वरच का आक्षेप घेत आहात? मराठी बोलणार नाही हे सांगितले की लोकांचा भडका उठतो. खासदार संजय राऊत म्हणाले की, मविआ ही विधानसभा तर इंडिया आघाडी लोकसभा निवडणुकीसाठी तयार करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी अशी आघाडी तयार झालेली नाही.प्रत्येक मनपा, जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी स्थानिक आघाड्या निर्माण केल्या जातात त्यात कधी-कधी राजकीय पक्षही नसतात. त्यामुळे ह्या निवडणुकीचे अधिकार स्थानिक पदाधिकाऱ्यांना असतात.

# हफ्ता न दिल्याने विक्रेत्याला पोलिसांनी केली बेदम मारहाण

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :

दोन पोलिसांनी एका विक्रेत्याला मारहाण केल्याची चित्रफित सध्या समाजमाध्यमावर व्हायरल झाली आहे. समता नगर पोलीस ठाण्यातील एक पोलीस आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाचा (एमएसएफ) कर्मचायार्ने ही मारहाण केल्याचे चित्रफितीत दिसत आहे. हफ्ता न दिल्याने ही मारहाण केल्याचा आरोप विक्रेत्याने केला आहे. याप्रकरणी संबंधित पोलिसांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

मालाड पूर्व येथील कुरार परिसरातील गांधी नगरमध्ये ४० वर्षीय व्यक्ती पान, सुपारी विक्रीचे काम करते. त्याची पानाची टपरी आहे. काही दिवसांपूर्वी त्याच्याकडे समता नगर पोलीस ठाण्यातीन दोन पोलीस कर्मचारी आले. हा विक्रेता गुटख्याची विक्री करीत असल्याचा त्याच्यावर आरोप केला. त्याला पोलीस ठाण्यात घेऊन गेले. मात्र त्याच्यावर कारवाई न करता त्याच्याकडे पैशांची मागणी केली. यानंतर त्याच्यावर गुन्हा दाखल न करता सोडून देण्यात आले.

विक्रेत्याने सदर पोलिसांना ठरल्याप्रमाणे पैसे दिले नव्हते. त्यामुळे संतप्त झालेले दोन्ही पोलीस त्याच्या टपरीवर गेले. या दोघांनी भर रस्त्यात त्याला बेदम मारहाण केली. यावेळी बघ्यांची गर्दी जमली होती. त्यातील काहींनी या मारहाणीची चित्रफित तयार केली. परंतु पोलिसांना त्याची कल्पना नव्हती. हा प्रकार ५ ऑगस्ट रोजी घडला होता. ही चित्रफित समाजमाध्यमावर व्हायरल झाली आणि हा प्रकार समोर आला. सध्या या विक्रेत्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहे.

पोलिसांनी आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या कर्मचाऱ्याने अशा प्रकारे मारहाण करणे चुकीचे असल्याचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. संबंधित विक्रेत्याकडे बंदी असलेला गुटखा आढळला होता.

# भास्कर जाधव वादाच्या भोवऱ्यात

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :

गुहागरच्या राजकारणात आज पुन्हा एकदा वादाची ठिणगी पडली आहे. शिवसेना (ठाकरे गट) नेते भास्कर जाधव यांनी हेदवतडमधील सभेत "खोतकी" संदर्भात केलेल्या विधानाने ब्राह्मण समाजात संतापाची लाट उसळली.

गुहागर तालुका ब्राह्मण सहाय्यक संघाने जाधव यांच्यावर थेट आरोपांचा भडिमार करत, "स्वतःच्या राजकीय स्वाथार्साठी तुम्ही तालुक्यातील ऐक्याला तडे देत आहात" असा इशारा दिला आहे. संघाच्या मते, जाधव यांच्या वक्तव्यामुळे अनेक वर्षांचे सामाजिक ऐक्य धोक्यात आले आहे. येत्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या विधानामागे खोल राजकीय डाव असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. "आज तुम्ही बोलत आहात, पण भूतकाळात ब्राह्मण समाजातील असंख्य उंबरठे आणि ओट्या झिजवत तुम्हीच राजकीय उंची गाठली" अशी बोचरी आठवण जाधव यांना संघाने पत्राद्वारे करून दिली. गुहागरच्या गल्लीपासून तालुका पातळीपर्यंत या वादाने खळबळ उडवली आहे. भास्कर जाधव यांचे समर्थक हा विरोध राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा दावा करत असताना, ब्राह्मण समाज ठामपणे आपली भूमिका मांडत आहे. आता सगळ्यांच्या नजरा एका प्रश्नाकडे खिळल्या आहेत.भास्कर जाधव प्रत्युत्तर देणार का, की शांततेचा मार्ग स्वीकारणार?

# भाजपला हिंदूंशी काहीही देणेघेणे नाही



विजय वडेट्टीवार यांचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ९ :

भाजप हिंदुत्वाच्या नावाखाली स्वतःची राजकीय पोळी भाजत आहे. यांना हिंदूंशी काही देणं घेणं नाही. आताही म्हणतात हिंदू खतरे मैं है, आमची सत्ता होती तेव्हा हिंदू सुरक्षित होता. आता दिल्ली ते गल्ली हिंदुत्ववादी सरकार आहे तरी देखील हिंदू खतरे मै हे असे म्हणत व्होट जिहाद भाजपकडून सुरू आहे, असा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, राज ठाकरे काय भूमिका घेतात? दोन भावांची युती होते, त्यांचे काय प्रस्ताव आहेत? त्यानंतर त्यांच्याकडून काही चर्चा होते का? खरं तर हा निर्णय राज्य पातळीवर होणार नाही.एकत्र बसायचा निर्णय हा स्थानिक पातळीवरचा निर्णय असतो.हा देशपातळीवरचा निर्णय नाही. त्यामुळे दोन बंधू एकत्र येऊ द्यात. अनेकांच्या पोटामध्ये खूप मोठ्या प्रमाणात वेदना होत आहेत. दोन भाव एकत्र आल्याने अनेकांची झोप उडाली आहे. ते आले तर आम्हाला आनंद आहे. काँग्रेस वेळेवर निर्णय घेईल पहिले ठाकरे बंधूंना एकत्र येऊ द्या. इंडिया आघाडी ही लोकसभेच्या निवडणुकीसाठी होती. विधानसभा निवडणुकीसाठी मविआ होती. आता स्थानिक आघाडी झाली तर तर झाली नाही झाली तर नाही झाली. स्थानिक पातळी संदर्भात राष्ट्रीय नेते लक्ष घालत नसतात. राहुल गांधी काय ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, मनपाला आघाडी करा असे सांगतात का? हा निर्णय स्थानिक लोकांना घ्यायचा आहे.

# दोन दुचाकींच्या धडकेत एकाचा मृत्यू, एक जखमी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :

भरधाव वेगात धावणाऱ्या दुचाकीने पुढील दुचाकीला धडक दिल्याची घटना शुक्रवारी चेंबूर परिसरात घडली. या अपघातात पुढील दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला असून पुढील दुचाकीला धडक देणाऱ्या दुचाकीवरील चालकही जखमी झाला आहे. याप्रकरणी टिळक नगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

चेंबूरमधील छेडा नगर परिसरात शुक्रवारी सायंकाळी ५ च्या सुमारास हा अपघात झाला. या अपघातात हनिफ शेख (४०) याचा मृत्यू झाला. हनिफ शीव येथून ठाण्याच्या दिशेने जात होता. छेडा नगर उड्डाणपूल परिसरातून जात असताना पाठीमागून आलेल्या एका दुचाकीने फनिफच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दोन्ही दुचाकीचालक गंभीर जखमी झाले. काही वाहन चालकांनी अपघाताची माहिती टिळकनगर पोलिसांना दिली. त्यानंतर तातडीने पोलिसांनी घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी दोघांनाही घाटकोपरमधील राजावाडी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच हनिफचा मृत्यू झाला होता. घटनास्थळी प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपी सोहेल खान याच्याविरोधात गुन्हा दाखल केला.

# हर्षवर्धन सपकाळ यांचा भाजपला 'चले जाव'चा इशारा

## 'करा किंवा मरा' अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याचा दावा



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :

देशात सध्या 'करा किंवा मरा' अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याचा दावा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त भाजपला आमचा 'चले जाव'चा संदेश असल्याचेही त्यांनी सांगितले. महात्मा गांधी यांचे स्वप्न पुढे घेऊन जाण्याचा आमचा संकल्प असल्याचेही सपकाळ यांनी म्हटले आहे.

ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त भारत छोडो चळवळीच्या 83 व्या वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्र काँग्रेसने मुंबईतील ऑगस्ट क्रांती मैदानावर निदर्शने केली. ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त महाराष्ट्र काँग्रेसने भारत छोडो चळवळीच्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईत मोर्चा देखील काढला. या वेळी महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, "हा मोर्चा महात्मा गांधींचा संकल्प पुढे नेण्याची प्रतिज्ञा आहे... या देशात हुकूमशाही आणण्याच्या प्रयत्ना विरुद्ध लोकांनी आपला संघर्ष सुरू ठेवला पाहिजे, ज्यामुळे 'करा किंवा मरा' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आज आम्ही भाजपला निघून जाण्याचा संदेश देत असल्याचे सपकाळ यांनी म्हटले आहे.

ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त महात्मा गांधींचे पणतू तुषार गांधी देखील उपस्थित होते. व यांनी ईडीवरील केलेल्या आरोपांवर ते म्हणाले की, निवडणूक आयोगाने त्यांचे आरोप योग्यरित्या फेटाळले नाहीत. असे दिसते की ते सबबी सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत..

म्हणून, जनतेने रस्त्यावर उतरून सरकारला आपली शक्ती दाखवणे अत्यंत महत्त्वाचे आहे." आज देशातील व्यवस्थेला तोडण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# आयडीबीआय बँकेतील प्रस्तावित हिस्सा विक्री विरोधात कर्मचारी संघटनांचे धरणे आंदोलन




■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :

सरकार आणि एलआयसीकडून आयडीबीआय बँकेतील प्रस्तावित हिस्सा विक्रीला विरोध करण्यासाठी युनायटेड फोरम ऑफ आयडीबीआय ऑफिसर्स अँड एम्प्लॉईजने (०९ ऑगस्ट २०२५) रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे धरणे आयोजित केले. या धरणे आंदोलनात २५० हून अधिक सदस्य सहभागी झाले होते आणि सरकारच्या या कुटिल हेतूबद्दल त्यांनी नाराजी दर्शविली आहे.धरणे आंदोलनाचे अध्यक्षपद ऑल इंडिया आयडीबीआय ऑफिसर्स असोसिएशनचे अध्यक्ष कॉम. सौरव कुमार यांच्यासह युनायटेड फोरमचे संयोजक शिर देवीदास तुळजापूरकर, युनायटेड फोरमचे संयुक्त संयोजक श्री विठ्ठल कोटेश्वर राव आणि युनायटेड फोरमचे संयुक्त संयोजक श्री रत्नाकर वानखेडे यांनी भूषवले.

धरणे आंदोलना दरम्यान, सदस्यांनी नफा मिळवणाऱ्या आणि पुनरुज्जीवित झालेल्या संस्थेला खाजगी कंपन्यांना विकल्याबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली. आयडीबीआय बँकेने गेल्या आर्थिक वर्षात ७५१५ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवून उल्लेखनीय वसुली केली आहे आणि एकूण एनपीए ५५५८८ कोटी रुपयांवरून (२७.९५%) फक्त रु. ६६९२ कोटी (२.९८%), या क्षेत्रातील सर्वोत्तम बँकांपैकी एक. बँकेची नफाक्षमता आणि आर्थिक उलाढाल चांगली असूनही, बँकेचे खाजगीकरण करण्यामागील तर्कावर असोसिएशनने प्रश्नचिन्ह उपस्थित केले.असोसिएशनने या निर्णयाला वित्तीय न्याय, आर्थिक स्वायत्तता आणि आत्मनिर्भर भारताच्या आदर्शांसाठी धोका असल्याचे म्हटले आणि सरकारला निर्गुंतवणुकीचा पुनर्विचार करण्याचे आवाहन केले.

पुढे, आंदोलन तीव्र करण्यासाठी, युनायटेड फोरमने ११ ऑगस्ट २०२५ रोजी प्रस्तावित भागभांडवल विक्रीला तीव्र विरोध करण्यासाठी देशव्यापी संपाची घोषणा केली आहे. विशेषतः दुबईतील एमिरेट्स एनबीडी आणि कॅनडातील परदेशी मूळ असलेल्या फेअरफॅक्स फायनान्शियल होल्डिंग्ज लिमिटेड यासारख्या परदेशी मूळ असलेल्या संस्थांना, जे आयडीबीआय बँक खरेदी करण्याचे मुख्य दावेदार आहेत, त्यांना विकले जावे असे कोणतेही कारण नाही. हे विशेषतः हास्यास्पद आहे जेव्हा भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार सत्तेत असते जे नेहमीच स्वदेशी आणि स्वावलंबनाचे समर्थन करते.संघटनांच्या मते, बोलीदारांना आता आर्थिक सेवा वाढविण्यात रस नाही तर त्यांना तेलंगणातील हैदराबाद येथील ५० एकर मालमत्तेसह आयडीबीआय बँकेच्या मालकीच्या विविध रिअल इस्टेट मालमत्तेत रस आहे. केंद्र सरकार ही प्रक्रिया लवकर पूर्ण करण्यास उत्सुक असल्याने, असे दिसते की बोलीदार भारत सरकार आणि नियामकांकडून विविध सवलती आणि सवलती मिळविण्यासाठी जोरदार सौदेबाजी करत आहेत. आजच्या तारखेला, आयडीबीआय बँकेत केंद्र सरकारचा ४५.४८% हिस्सा आहे, तर केंद्र सरकारच्या मालकीच्या एलआयसीचा ४९.२४% हिस्सा आहे आणि अर्थ मंत्रालयाच्या गुंतवणूक आणि सार्वजनिक मालमत्ता व्यवस्थापन विभाग केंद्र सरकारचा ३०.४८% हिस्सा आणि एलआयसीचा ३०.२४% हिस्सा विकण्याच्या प्रक्रियेत आहे.

# मतदार चोरीवरून विखे थोरात आमने-सामने

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :

दिल्लीपासून संगमनेरपर्यंत राजकारणात वादळ उठवणारा मतदार चोरीचा मुद्दा आता थेट शिर्डीच्या राजकीय रिंगणात पेटला आहे. काँग्रेस नेते व लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी नुकतेच तीन राज्यांमधील मतदान चोरीचा आरोप करत निवडणूक आयोगावर थेट हल्ला चढवला. त्यातच शिर्डी मतदारसंघातील मतदार नोंदणी घोटाळ्याचा उल्लेख करताच महाराष्ट्रातील राजकीय पारा चढला.

राहुल गांधींच्या विधानानंतर संगमनेरचे काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी भाजप मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शिर्डी विधानसभा मतदारसंघावर निशाणा साधला. थोरातांच्या आरोपांवर मंत्री विखे पाटील तितक्याच जोशात उतरले. कर्नाटक आणि तेलंगणात काँग्रेसचे सरकार बोगस मतदानाने आले का? लोकांनी महाविकास आघाडीला धुडकावले, हे मतदारांचा अपमान आहे असा पलटवार करत राहुल गांधींवरही निशाणा साधला. राहुल गांधींनी बोगस मतदानाबाबत शपथपत्र केलं, तर आरोप सिद्ध करावे लागतील.

# राज्यपालांचं पितृत्व आणि लेकींचं प्रेम...

## पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या लेकींचे राजभवनात राखीबंधन



■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ९ :

आईविना वाढलेल्या, पण ममताशून्य कधीच न झालेल्या पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या ममता बाल सदन मधील निरागस मुलींनी रक्षाबंधनाच्या पावन पर्वावर एक अनोखी राखी आपल्या राज्यपिताच्या हातात बांधली... आणि राजभवनात क्षणभर जग थांबल्यासारखं वाटलं. राज्यपालांच पितृत्व आणि लेकींच प्रेम असा हृदयस्पर्शी अनुभव माईंच्या लेकींनी राज भवनात अनुभवला.

पद्मश्री डॉ.सौ. सिंधुताई सपकाळ यांच्या प्रेमळ सानिध्यात घडलेल्या या मुली, ज्यांनी जीवनात अडथळे पाहिले, पण हार मानली नाही, त्यांनी रक्षाबंधनाच्या पावन पर्वावर महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. सी. पी. राधाकृष्णन यांना राखी बांधली. ही केवळ एक औपचारिकता नव्हती, तर प्रत्येक राखीमागे होती एक भावना आम्हालाही कुणीतरी आहे. जे आमचं असतं. राज्यपालांनीही या मुलींना केवळ पाहुण्या म्हणून नाही, तर आपल्याच घरातल्या लेकीप्रमाणे प्रेमाने गळामिळवून घेतलं. त्यांनी प्रत्येकाच्या डोळ्यांत डोकावून तिच्या मनातली स्वप्नं जाणून घेतली, तिच्या हातात आश्वासक शब्दांची राखी बांधली. "तुम्ही एकट्या नाही आहात, मी तुमच्यासोबत आहे," हे शब्द तेव्हा त्यांच्या तोंडून नाही, तर डोळ्यांतून उमटत होते. सिंधुताईंच्या कार्याची आणि त्यागाची सावली ज्या लेकींच्या अंगावर असते, त्या लेकी इतक्या गोड, निरागस आणि आत्मविश्वासाने भरलेल्या असतात, हे पाहून अनेकांचे डोळे पाणावले. राजभवनाच्या भिंतींना आज लेकींच्या हसण्याचा गोड नाद ऐकू येत होता, आणि राज्यपालांच्या मृदू स्पर्शाने त्या लेकींच्या हृदयात वडिलांची उब खोलवर मुरत होती. हा सोहळा म्हणजे केवळ राखीचा नव्हता तो माणुसकीचा, आपुलकीचा, आणि प्रेमाच्या अमर बंधाचा होता.

राज्यपालांची भेट घेतलेल्या संस्थांमध्ये सिंधुताई सपकाळ यांनी सुरु केलेले ममता बाल सदन (बालगृह), कुंभारवळण, मुंबई महानगर पालिका शाळेतील विद्यार्थिनी, मुंबई मनपा अंतर्गत विविध महिला बचत गटांच्या सदस्य, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर,जिल्हा ठाणे येथील विद्यार्थिनी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण जिल्हा रायगड येथील विद्यार्थीनी, नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (नॅब)च्या येथील दृष्टिहीन विद्यार्थिनी, प्रतीक्षा महिला बचत गटातील महिला यांचा समावेश होता. भारत विकास परिषद माटुंगा तसेच प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या भगिनी व बांधवांनी देखील राज्यपालांना राखी बांधली. या प्रसंगी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, उपसचिव एस राममूर्ती, खासगी सचिव अर्चना गायकवाड, राज भवनचे जनसंपर्क अधिकारी उमेश काशीकर, पद्मश्री डॉ. सौ. सिंधुताई सपकाळ यांचे पहिले मानसपुत्र तथा ममता बाल सदन संस्थेचे अध्यक्ष दिपकदादा गायकवाड, अधीक्षिका स्मिता पानसरे, सुजाता गायकवाड, ममता बाल सदनचे जनसंपर्क अधिकारी मुकेश चौधरी, प्रसन्न गायकवाड, माईंच्या लेकी कु. साक्षी, कु. अनिता, कु. जान्हवी, कु. पावनी आदि उपस्थित होते. यावेळी राज्यपालांनी सर्वांच्या राखीचा स्वीकार करीत सर्वांची विचारपूस केली .

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219